रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९| अंक १३९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## अलिबाग–वडखळ मार्गावर वाहतूककोंडी

**अलिबाग :** अलिबाग–वडखळ महामार्गावर रविवारी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली असून, शहाबाज ते पेझारी चेकपोस्टपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. सुटीच्या पार्श्वभूमीवर अलिबागकडे मोठ्या संख्येने पर्यटकांनी धाव घेतल्याने तसेच परतीच्या प्रवासाला लागलेल्या वाहनांमुळे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. मुंबईहून येणारी तसेच अलिबागहून परतणारी वाहने कोंडीत अडकली आहेत. पोयनाड आणि पेझारीसारख्या व्यापारी भागांतही वाहनांची प्रचंड गर्दी झाल्याने बाजारपेठ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग पान २ वर


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹



## शॉप जागा उपलब्ध

पॅराडाईज एन्क्लेव्ह, गाव मौजे चिंचवली–शेकिन, तालुका–खालापूर, जिल्हा–रायगड, उद्य विहारसमोर, लवजी स्टेशनपासून चालण्याच्या अंतरावर, सुमारे १२५० चौरस फूट ग्राउंड फ्लोअर शॉप जागा भाड्याने किंवा विक्रीसाठी उपलब्ध व C.C. आणि O.C. प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत.

NAME : PRALHAD JAGANNATH KANSE
EMAIL ID : pjkcorporation@kansetransport.com
CONTACT DETAIL : 9320682777


# 'बळी' राजाची झोळी रिती

## परतीच्या पावसाने भातशेती उद्ध्वस्त



प्रमोद जाधव

| अलिबाग |

रायगड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून, शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे काढणीला आलेले भातपीक गमावण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतांमध्ये आडव्या झालेल्या पिकावर पाणी साचल्याने भातपिकाला मोड येऊन ते कुजण्याची भीती आहे. त्याचप्रमाणे उभे असणारे पीक शेतात पाणी असल्याने कापणी करता येत नाही. परिणामी, भातपीक धोक्यात आले आहे. त्याचबरोबर आंबा पिकालादेखील तुडतुड्याचा धोका निर्माण झाला आहे. पांढरा कांद्याचा हंगामही लांबणीवर गेला आहे. एकंदरीत, परतीच्या पावसाने शेतकऱ्याचे कंबडरे मोडले असून, तो आर्थिक संकटात सापडला आहे.

जिल्ह्यामध्ये ८४ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भातपिकांची लागवड करण्यात आली आहे. कोलम, सुवर्णा, रत्ना अशा अनेक पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले. भातपीक बहरले आहे. भातपीक कापणी योग्य झाल्याने मागील पंधरा दिवसांपासून कापणीला सुरुवात पान २ वर

### कांद्याचा हंगाम लांबणीवर

जिल्ह्यात विशेष करून अलिबाग तालुक्यात पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र ३०० हेक्टर आहे. कार्ले परिसरात मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड केली जाते. पांढऱ्या कांद्याची रोपे लागवडीसाठी तयार झाली आहे. परंतु, शेतांमध्ये पाणी साचल्याने लागवड करणार कशी, असा प्रश्न कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. पाऊस असाच सुरू राहिल्यास कांद्याला बुरशीचा धोका जाणवेल. १४ नोव्हेंबरपर्यंत होणारी कांद्याची लागवड एक महिना उशिरा होण्याची शक्यता आहे. त्याचा उत्पादनावर परिणाम होऊ शकतो, असे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले.



### आंबापिकाला धोका

जिल्ह्यात आंब्याचे क्षेत्र १७ हजार हेक्टर आहे. अवकाळी पावसासह कधी ढगाळ तर कधी कडक उन्ह या बदलत्या वातावरणामुळे आंबा उत्पादनावर परिणाम झाल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. आंब्यावर तुडतुडयासह इतर किडरोगांचा धोका निर्माण होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

> भातपीक चांगल्या पद्धतीने बहरले आहे. परंतु, बदलत्या वातावरणाचा पिकावर मोठा परिणाम होऊ लागला आहे. पावसामुळे भातपिकाची दैना उडाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून भातपिकावर तुडतुड्या व अन्य किडरोगाचा प्रादुर्भाव आहे. हातातोंडाशी आलेला घास या रोगांमुळे जाण्याची भीती आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह आंबा उत्पादक शेतकऱ्यांनादेखील त्याचा फटका बसणार आहे.
>
> – सतीश म्हात्रे, शेतकरी

> जागतिक हवामान बदलामुळे (ग्लोबल वॉर्मिंग) वातावरणात आमूलाग्र बदल होत आहे. अनेक किडरोगांचा प्रादुर्भाव आंब्यावर होत आहे. परतीचा पाऊस लांबल्याने मोहर प्रक्रियेला खीळ बसली आहे. ही प्रक्रिया उशिरा होणार आहे. बऱ्याचशा आंब्याच्या बागांना छोटी पालवी दिसत आहे. मोहर उशिरा येईल. आंब्याचे उत्पादन मार्चच्या पुढे जाईल. त्यामुळे कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.
>
> – चंद्रकांत मोकल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ

## वेधक

### पुढील चार दिवस मुसळधार

**मुंबई :** मान्सून देशातून परतला असला तरीही अद्याप अनेक राज्यांमध्ये पाऊस सुरू आहे. महाराष्ट्रात येत्या चार ते पाच दिवसात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अरबी समुद्रासह बंगालच्या उपसागरातही कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. यामुळे बुधवार, दि. २९ ऑक्टोबरपर्यंत राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यामध्ये येत्या चार दिवसात पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

### आरोपी बदने पोलिसांना शरण

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर महिलेच्या आत्महत्या प्रकरणातील मुख्य आरोपी निलंबित पीएसआय गोपाळ बदने फलटण पोलिसांसमोर शनिवारी रात्री आत्मसमर्पण केले आहे. महिला डॉक्टरने आत्महत्या केल्यानंतर मुख्य आरोपी गोपाळ बदने फरार झाला होता, तर दुसरा आरोपी प्रशांत बनकर याला पोलिसांनी अटक केली होती. बदने दोन दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. त्याच्या अटकेसाठी पोलिसांची चार पथके तैनात करण्यात होती. त्याचे लोकेशन पंढरपूर असल्याचे आढळून आले होते.

### वीज पडून विद्यार्थ्याचा मृत्यू

**गडचिरोली :** शेतात धानाच्या गंजीवर ताडपत्री झाकण्यासाठी गेलेला १० वी च्या वर्गातील विद्यार्थ्याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे. तर, दुसरा जखमी झाला आहे. कोरची तालुक्यातील केसालडाबरी येथे ही घटना घडली आहे. सरगम सोमनाथ कोरचा (१७) असे मृत, तर योगेश घावळे (१७) असे जखमी मुलाचे नाव आहे. सरगम कोरचा हा मसेली येथील छत्रपती विद्यालयात शिकत होता. सरगम हा त्याचा गोंदिया जिल्ह्यातील गुजूरबडगा येथील नातेवाईक योगेश घावळे याच्यासह धानाच्या गंजीवर ताडपत्री टाकण्यासाठी गेला होता. परंतु, पाऊस असल्याने दोघेही झाडाखाली थांबले होते.

# व्यापारी संकुल ठेकेदाराच्या घशात घालण्याचा डाव

## नेरळमधील टपरीधारकांकडून होतोय आरोप

| नेरळ | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेने व्यापारी संकुलामधील १०४ गाळ्यांचे वाटप करण्यासाठी ई–निविदा काढली आहे. ही निविदा काढताना एक–एक गाळा वाटप करण्यात येईल, अशी निविदा काढलेली नाही, तर एकावेळी १०४ गाळ्यांचे वाटप ठेकेदाराला केले जाणार आहे.त्यानंतर संबंधित ठेकेदार हा भाडेतत्वावर गाळे देणार आहे. एक–एक गाळा घेता येणार नसल्याने व्यापारी संकुलातील गाळे ठेकेदाराच्या घशात घालण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप नेरळमधील मूळचे टपरीधारक यांच्याकडून केला जात आहे.

मागील महिन्यात रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी नेरळ



गावातील व्यापारी संकुलाची पाहणी केली होती. त्यानंतर लगेच त्या संकुलातील गाळ्यांचे वाटप करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी अनेक वर्षे जिल्हा परिषदेत सत्ता नसल्याने हा धोरणात्मक निर्णय त्या त्या काळातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला नव्हता. तर मग आजही रायगड जिल्हा परिषदेत सदस्य मंडळ अस्तित्वात नसतानादेखील नेरळ व्यापारी संकुलातील गाळ्यांचे वाटप केले जाणार आहे. हे कोणत्या नियमाला धरून असल्याचा प्रश्न व्यापारी संकुलात गाळा मिळेल या आशेवर असलेली टपरीधारकांना पडला आहे. पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी असा धोरणात्मक निर्णय सदस्य मंडळ अस्तित्वात आल्यावर घेईल असे सांगत असताना, सध्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी हा निर्णय घेतल्याने टपरीधारक नाराज आहेत. एवढे वर्षे आम्हाला टपरीऐवजी गाळे देण्याचे दिलेले आश्वासन ग्रामपंचायत पान २ वर

### दोन वर्षे वितरण प्रक्रिया का नाही?

व्यापारी संकुलातील आता गाळ्यांचे होणारी प्रक्रिया ही आणखी काही महिने थांबवावी. दोन महिन्यांत जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक होणार असताना व्यापारी संकुलातील गाळ्यांचे वाटप करण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. ही निविदा प्रक्रिया त्वरित थांबवावी, अशी मागणी नेरळमधील टपरीधारक करीत आहेत.

# मासेमारी बोटी माघारी परतल्या

## मुंबईनजीक बोट बुडाली, खलाशी मात्र बचावले

| उरण | प्रतिनिधी |

रविवारी अचानकपणे निर्माण झालेल्या वादळीवाऱ्यामुळे समुद्रात तीन दिवसांपूर्वी खोल समुद्रात मासेमारी गेलेल्या बोटी अर्ध्यावरून परतल्या आहेत. दरम्यान, मुंबईपासून काही अंतरावर उरण परिसरातील एक मासेमारी बोटी बुडाली असून, यातील खलाशांना वाचविण्यात यश आले आहे. या हंगामात ही नववी वेळ असून, वादळामुळे मासेमारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे.

समुद्र खवळल्याने धोक्याचा इशारा देणारा बावटा लावण्यात आला आहे. त्यामुळे मासेमारीसाठी रवाना झालेल्या बोटींना माघारी परतावे लागले आहे. यातील २५० पेक्षा अधिक बोटी करंजा बंदरात, तर १८० पेक्षा अधिक बोटींनी कोकणातील विविध बंदरांत नांगर



टाकला आहे. या वादळीवाऱ्यामुळे मासेमारीसाठी अर्ध्या समुद्रात गेलेल्या बोटी परत आल्या आहेत. त्यामुळे यासाठी करण्यात आलेला तीन लाखांपेक्षा अधिकचा खर्च वाया गेला आहे. त्यामुळे या वादळीवाऱ्यांनी मच्छिमारांचे नुकसान झाले आहे. तर, दुसरीकडे उपवासाचे दिवस संपल्याने मासळीच्या मागणीत वाढ झाली आहे. उपवास व धार्मिक उत्सवामुळे मासे खाणाऱ्या खवय्यांची संख्या घसरली होती. त्यामुळे बाजारपेठेत दरही गडगडले होते. करंजा बंदरात येणाऱ्या मासळीला उठावच नव्हता. पान २ वर

### जंजिऱ्याचे दरवाजे बंद

**कोर्लई :** गेल्या दोन–तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण, वादळ वारा व विशेषतः सायंकाळी विजांच्या कडकडाटात पडणारा पाऊस यामुळे मुरुड जंजिरा पर्यटनात जंजिरा किल्ला बंद ठेवण्यात आल्याने दिवाळीच्या सुट्टीत आलेल्या पर्यटकांचा हिरमोड झाला असून, याचा पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या जलवाहतूक व्यावसायिकांना फटका बसला आहे. मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी खोरा बंदर, राजपुरी बंदर, दिघी बंदर या ठिकाणाहून जलवाहतूक सुरु असते. दिवाळी सणात पान २ वर

# नागाव ग्रामपंचायतीत लाखोंचा भ्रष्टाचार?

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून चौकशीचे आदेश

| उरण | प्रतिनिधी |

तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीत झालेल्या प्रचंड आर्थिक गैरव्यवहाराचा भांडाफोड होताच अखेर प्रशासनालाही जाग आली आहे. नागाव ग्रामपंचायतीतील लाखो रुपयांच्या निधीचा गैरवापर, हिशोबातील फेरफार आणि विकासकामांच्या नावाखाली लुटारू कारभार सुरू असल्याची गंभीर तक्रार कल्पेश कमळाकर सुतार आणि इतर ग्रामस्थांनी दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी केली होती. या तक्रारीची दखल घेत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी गटविकास अधिकाऱ्यांना तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या आदेशानंतर नागाव ग्रामपंचायतीत आणि उरण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. ग्रामस्थांनी केलेल्या आरोपांनुसार मागील काही वर्षांपासून ग्रामपंचायतीत निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार होत आहे. ग्रामविकास योजनांच्या नावाखाली बनावट खर्च दाखवून कागदोपत्री कामे सुरू असल्याचे दाखवले जाते, मात्र प्रत्यक्षात जमिनीवर काहीच नसते. या प्रकारात काही माजी पदाधिकाऱ्यांचे, पान २ वर

# आरटीओ कर्मचाऱ्यांचे आजपासून उपोषण

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील मोटार वाहन विभागातील (आरटीओ) कर्मचारी प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारपासून बेमुदत साखळी उपोषण करणार आहेत. मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली असून, सर्व रिक्त पदांवर तातडीने पदोन्नती करावी ही त्यांची प्रमुख मागणी आहे. मागील तीन वर्षांपासून कर्मचारी संघटना संयमाने लढा देत आहे; परंतु परिवहन विभागाकडून त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यांनी सांगितले की, विभागाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याने अखेर त्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे.

# आयोगाविराधात डावे पक्षही रस्त्यावर उतरणार

## १ नोव्हेंबरच्या मोर्चात सहभागी होण्याचा एकमताने निर्धार

| मुंबई | प्रतिनिधी |

सदोष मतदारयाद्या दुरुस्त करून अद्ययावत केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नका, या मागणीकरिता येत्या १ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याविरोधात महाविकास आघाडी–मनसेने विराट मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चात महाविकास आघाडीचे घटक पक्ष असणाऱ्या राज्यातील डाव्या पक्षांनीही रस्त्यावर उतरण्याचा निर्णय एकमताने घेतला आहे.

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या फोर्ट येथील कार्यालयात पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी डाव्या पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली, या बैठकीत राज्यव्यापी प्रचार मोहीम राबवून या मोर्चात मोठ्या संख्येने भागीदारी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीला जयंत पाटील यांच्यासह प्रा. एस.व्ही. जाधव आणि ॲड. राजेंद्र कोरडे (शेतकरी कामगार पक्ष), कॉम्रेड शैलेंद्र कांबळे (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), कॉम्रेड प्रकाश रेड्डी (भारतीय कम्युनिस्ट पक्ष), कॉम्रेड किशोर ढमाले (सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष), कॉम्रेड श्याम गोहिल आणि कॉम्रेड दत्तू अत्याळकर (सीपीएल–एमएल, लिबरेशन), कॉम्रेड किशोर कर्डक (फॉरवर्ड ब्लॉक) हे डाव्या पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कॉम्रेड डॉ. भारत पाटणकर (श्रमिक मुक्ती दल) आणि इतर अनेक डाव्या पुरोगामी पक्ष संघटनांनी या भूमिकेला पाठिंबा दर्शवून मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे कळवले आहे.

दरम्यान, मतदार याद्यातील दुबार नावे, इतर ठिकाणची घुसडलेली नावे, अस्तित्वात नसलेले आणि अपूर्ण पत्ते, वय आणि लिंगातील तफावती, मतदार यादीत फोटो नसणे, तसेच मागील वर्षभरापासून वयाची अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या तरुणांना सरसकट मताधिकार नाकारणे, या आणि अशाप्रकारच्या अनेक दोषांनी सदोष झालेल्या मतदार याद्यांचा वापर करून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे म्हणजे लोकशाहीची घोर थट्टा आहे. संविधानाने दिलेल्या अमूल्य अशा मताधिकारावर पान २ वर

# राज्यात ६० नवी दस्तनोंदणी कार्यालये होणार

| पुणे | प्रतिनिधी |

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने राज्यात ६० खासगी दस्तनोंदणी कार्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येत्या सहा महिन्यांत ही कार्यालये सुरू होणार आहेत. तसेच, पहिल्या टप्प्यात पुणे, मुंबई या शहरात कार्यालये सुरू होणार आहेत. दरम्यान, जादा सहा हजार रुपये देऊन ग्राहकांना दस्तनोंदणी करता येणार आहे. राज्य शासनाने दस्तनोंदणीची सुविधा अधिक गतिमान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यात ६० खासगी कार्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या कार्यालयांमधून पासपोर्ट कार्यालयात देण्यात येणाऱ्या सुविधा मिळणार आहेत.

## दसऱ्यानंतर दिवाळीचाही मुहूर्त हुकला | १ नोव्हेंबरला नेरळ ते माथेरानदरम्यान धावणार

# माथेरानच्या राणीला पावसाचा अडसर

| नेरळ | प्रतिनिधी |

दरवर्षीदसऱ्याच्याशुभमुहूर्तावर सुरू होणारी नेरळमाथेरान मिनीट्रेन यावर्षी उशिरा धावणार आहे. पूर्वी दसऱ्यानंतर १५ ऑक्टोबरला ट्रेनचा मुहूर्त ठरवला गेला होता. मात्र, सततच्या अनियमित पावसामुळे हा मुहूर्तही हुकला. परिणामी, यंदा तब्बल एक महिना उशीर झाला असून ट्रेन अद्याप सुरू झालेली नाही. मात्र, रेल्वे विभागाचे प्रयत्न सुरू असून, १ नोव्हेंबरला म्हणजेच पहिल्या आठवड्यात




### अमन लॉजमाथेरान शटल सेवा पर्यटकांच्या सेवेत

दरम्यान, अमन लॉज ते माथेरान ही शटल सेवा सध्या सुरू असून, पर्यटकांना तिचा आनंद घेता येतो आहे. मुसळधार पावसातही ही सेवा अखंडित सुरू राहिली आहे. त्यामुळे माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे.

### १९०७ पासूनची ऐतिहासिक परंपरा

माथेरान मिनी ट्रेन ही १९०७ साली ब्रिटिश काळात सर आदमजी पिरभाय यांनी सुरू केली होती. दरवर्षी १५ जून रोजी पावसाळ्यामुळे ट्रेन बंद केली जाई आणि दसऱ्याच्या सुमारास पुन्हा सुरू केली जात असे. या ट्रेनमुळे माथेरानच्या पर्यटनाला मोठी चालना मिळते. परंतु, यंदा अनियमित हवामानामुळे शिरस्ता मोडीत निघाल्याने पर्यटक आणि व्यापारी दोघेही नाराज आहेत. मे महिन्यातच सुरू झालेला पाऊस सहा महिने झाले ऑक्टोबर संपायला आला तरी माथेरानमध्ये मुसळधार पाऊस सुरूच आहे.

> मिनीट्रेन १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा आमचा प्रयत्न होता. मात्र, आता साधारण १ नोव्हेंबरला पहिली नेरळपासून माथेरान मिनी ट्रेन सुरू करण्यात येणार आहे.
>
> – डॉ. स्वप्नील नीला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

मिनीट्रेन नेरळ रेल्वे स्थानकातून माथेरान दिशेला धावेल, अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी माध्यमांना दिली आहे.पर्यटकांच्या आवडत्या पान २ वर

# भरकटलेला बोया श्रीवर्धन समुद्रकिनारी

| रायगड | प्रतिनिधी |

श्रीवर्धन येथील जीवनाबद्दल परिसरात रविवारी सकाळी एक भला मोठा बोया किनारी लागल्याने खळबळ उडाली होती. स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र बाणकोट खाडीतून भरकटलेला हा बोया असल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

खालचा जीवना बंदर येथे चारचाकी वाहनांचे टायर लावलेला बोया वहात आला आहे , अशी माहिती मेरी टाईम बोर्डाचे कर्मचारी नीतेश तांबे यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात दिली. त्यामुळे किनारपट्टीवरील भागात खळबळ उडाली होती. बोया पाहण्यासाठी



स्थानिकांनी मोठी गर्दी केली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि मेरीटाईम बोर्डाने हा बोया कुठून आला याचा शोध सुरू केला.

श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला ते मंडणगड तालुक्यातील बाणकोट दरम्यान खाडी पुलाच्या पिलरचे काम चालू असून रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट सागरी पोलीस हद्दीत एक बार्ज बुडाला होता.सदरचा बुडालेला बार्ज पान २ वर

# न्हावाशेवा रेल्वे स्थानकाला सरकते जिन्याची प्रतीक्षा

। उरण । प्रतिनिधी ।

उरणला रेल्वे सुविधा आली पण तिच्या जेवढ्या सुविधा त्याच्या कईक पटींच्या असुविधांनी प्रवासी अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. रेल्वे सुरू होऊन आत्ता सुमारे दीड वर्ष झाले त्यानंतरही नवघर म्हणजेच न्हावा शेवासारख्या महत्वाच्या स्टेशनच्या दक्षिण बाजूस अजूनही तिकीट खिडकीच सुरू करण्यात आलेली नसल्याने केवळ तिकीट काढण्यासाठी एकदा छप्पन पायऱ्या चढायच्या पुन्हा तेवढ्याच पायऱ्या उतरायच्या आणि तिकीट घेऊन पुन्हा तेवढ्याच पायऱ्या चढून पुन्हा स्टेशनात ५६ पायऱ्या उतराव्या लागत असल्याने या मार्गावरून प्रवास करणारे प्रवासी कब तक छप्पन असे मिश्किल पणे बोलू लागले आहेत.



उरणच्या पूर्व भागातील नागरिकांना मुंबई, नवी मुंबई, ठाणे आदी प्रवासा साठी रेल्वेचा प्रवास हा सुकर प्रवास झाला आहे. ना धूळ, ना खड्डे आणि फारशी गर्दीदेखील नसते, त्यामुळे बसायलादेखील आरामात मिळत असल्याने ट्रेनच्या प्रवासाला नागरिकांची पहिली पसंती आहे. या प्रवासात उरणच्या पूर्व भागातील नागरिकांना नवघर म्हणजेच न्हावा शेवा नावाचे स्थानक जवळचे पडत आहे. मात्र, या प्रवासातील अत्यंत महत्त्वाचे स्थानक असलेल्या न्हावा शेवा म्हणजेच नवघर स्टेशन परिसरात स्थानकाच्या उत्तर दिशेला तिकीट खिडकी आहे मात्र प्रवासी हे सर्व दक्षिणेकडून येणारे असल्याने प्रवाशांना उत्तरेचे स्टेशन उलटे पडत आहे. त्यामुळे त्यांना स्टेशनच्या पलीकडे जाऊन तिकीट काढावे लागत आहे.

त्यासाठी प्रवाशांना ११२ पायऱ्या चढणे आणि पुन्हा तेवढ्याच पायऱ्या उतरणे अशी दररोज कसरत करावी लागत आहे. हे करतांना ज्याला अर्जंट गाडी पकडायची आहे त्याची तर पुरती तारांबळ होत असल्याचे पहायला मिळत आहे.

रेल्वेच्या तिकीट मास्तरांना या बाबत विचारले असता ते आमच्या हातात नाहीय, वरिष्ठ अधिकारी वर्गाने दक्षिणेकडील तिकीट खिडकी सुरू केल्यास आणि त्यासाठी वेगळे कर्मचारी नेमल्यास नक्कीच नागरिकांना होणारा त्रास वाचण्याची आशा त्यांनी बोलतांना व्यक्त केली . विशेष म्हणजे, या स्टेशनवर लिफ्टसाठी कोनाडे तयार केले आहेत मात्र त्यात लिफ्टदेखील बसविलेली नाही. त्यातच एकाच फलाटावर एक्सिलेटर आहे मात्र ते देखील बऱ्याचदा बंद असल्याचा अनुभव प्रवाशांना येत असल्याचे प्रवाशांनी बोलतांना सांगितले आहे.

अपुऱ्या सुविधांचा त्रास विशेष म्हणजे याचा सर्वाधिक फटका हा उरणच्या पुर्व भागातील नागरिकांना बसत आहे. त्यामुळे ट्रेन आली खरी मात्र तिकीट खिडकी दक्षिणेला कधी येणार आणि त्यासाठी प्रवाशांना अजून किती वाट पहावी लागणार, असा सवाल प्रवासी वर्गाकडून विचारला जात आहे. त्यातच रात्री १० नंतर रिक्षा देखील अल्प असल्याने प्रवाशांना नवघर सर्कल पर्यंत चालत जाऊन उरण पूर्व भागात जावे लागत असल्याने प्रवाशांमध्ये कमालीचा संताप व्यक्त केला जात आहे.

## घारापुरीच्या बेटावर महिलांचा बचत गट सुरू

। उरण । प्रतिनिधी ।

घारापुरी हे फक्त ऐतिहासिक बेट नाही, तर आता स्वावलंबनाचं बेट बनत चाललंय. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत नुकतेच ग्रामपंचायत कार्यालयात घारापुरी येथील महिलांच्या बचतगटांसाठी एक विशेष शिबीर घेण्यात आलं. या शिबिरात बचतगट अधिकारी श्री. नेमाडे यांनी महिलांना मार्गदर्शन करून स्वावलंबनाचा नवा मंत्र दिला. घारापुरी हे बेट असल्याने रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित आहेत. पण या बेटावरच्या महिला हार मानायला तयार नाहीत. बचतगटांच्या माध्यमातून स्वतःचा आर्थिक कणा मजबूत करण्याचं ठरवलं आहे. सरकारकडून या बचतगटांसाठी भरीव निधी उपलब्ध असून, एकत्र येऊन काम करणाऱ्या महिलांना याचा थेट लाभ मिळणार आहे. महिलांना केवळ रोजगारच नव्हे, तर 'आर्थिक स्वातंत्र्याचा सागर' गवसणार आहे. यावेळी सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकूर, सदस्य, ग्रामसेवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शास्ती माफीच्या अभय योजनेसाठी मुदतवाढ हवी

■ शिवसेनेतर्फे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषदेच्या मालमत्ता करावरील शास्ती माफीच्या अभय योजनेसाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी कर्जत शहर शिवसेना यांच्यावतीने करण्यात आली. शिवसेना पक्षाने शास्ती माफीसाठी पालिका मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मुदतवाढ दिल्याने अभय योजनेचा फायदा होण्याची शक्यता कर्जत शहरवासीय यांना मिळाली आहे.

कोरोना काळात नागरिकांचे उत्पन्नाचे साधन आणि स्रोत कोलमडल्याने अनेकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. या काळात मोठ्या प्रमाणात मालमत्ताधारकांनी कर भरण्यात अडचणी येत असल्याने त्यांच्या थकबाकीची रक्कम वाढत गेली. त्यावर लागणाऱ्या दोन टक्के शास्तीमुळे अनेकांचे ओझे वाढले. या पार्श्वभूमीवर आमदार महेंद्र थोरवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शास्ती माफीची मागणी केली होती. या मागणीला शासनस्तरावर मान्यता मिळून शास्ती माफी योजना जाहीर करण्यात आली.शहरातील अनेक नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक अर्ज भरता न आल्याने, वाढीव कालावधी देऊन सर्वसामान्यांना दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात आली.

मात्र या योजनेची अंमलबजावणी सुरू असताना अनेक सण-उत्सवांमुळे तसेच कर्जत नगरपरिषदेने अर्ज भरण्याची अंतिम तारीख २३ ऑक्टोबर निश्चित केल्याने अनेकांना अर्ज सादर करता आले नाहीत. त्यामुळे योजनेचा लाभ घेण्याची संधी हुकल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेतर्फे शहर प्रमुख अभिषेक सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात अभय योजनेचा कालावधी वाढवून आणखी दोन महिने मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वाढीव मुदतीमुळे अधिकाधिक नागरिकांना शास्ती माफीचा लाभ घेता येईल आणि नगरपरिषदेच्याही कर वसुलीमध्ये वाढ होईल, असे मत शिवसेनेने व्यक्त केले आहे.

## महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा



■ (छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

। खांब । प्रतिनिधी ।

दिवाळी सण संपताच पर्यटनासाठी ठिकठिकाणी निघालेल्या पर्यटकांच्या वाहनांची संख्या महामार्गावर वाढू लागल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने सन डे अखेर ट्रॅफिक डे ठरला आहे.

दिवाळी सणानिमित्त मुंबई, पुणे, ठाणे व अन्य ठिकाणाहून आपापल्या गावी आलेले नोकरदार परतीच्या प्रवासाला लागले असल्याने तसेच अद्याप शाळा, कॉलेजना असलेल्या सुट्टीचा सदुपयोग घ्यावा या उद्देशाने पर्यटनासाठी निघालेल्या पर्यटकांच्या वाहनांची संख्या एकाचवेळी महामार्गावर वाढू लागली आहे. महामार्गाच्या मुख्य ठिकाणांवर अगोदरच असलेल्या रहदारीमुळे तसेच महामार्गाच्या रूंदीकरणाचे काम अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याने वाहतूक कोंडीचीसमस्या निर्माण होऊलागली आहे. महामार्गावर तासन्तास होत असलेल्या वाहतूकोंडीमुळे पर्यटक व वाहनचालक यांनाही मनस्ताप पत्करावा लागत आहे. महामार्गाचे अपूर्ण अवस्थेत असलेले बांधकाम, पावसाळ्यात पडलेले खड्डे, अवजड वाहने यामुळे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडत असल्याचे दैनंदिन प्रवासीवर्गानी वाहतूक कोंडीबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## सुधाकर खांडविलकर यांचे निधन

**अलिबाग :** सुधाकर बाळकृष्ण खांडविलकर यांचे रविवार, दि.१९ ऑक्टोबर रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळामुळे शिवाजी पार्क येथे राहत्या घरी निधन झाले. सुधाकर खांडविलकर हे मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये कामाला होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावामुळे ते संपूर्ण माहीम दादर परिसरामध्ये लोकप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. अलिबाग तालुक्यातील शेखाचे गाव येथील ते ग्रामस्थ होते. त्यांच्या पश्चात तीन मुले कौशिक, लक्ष्मीकांत हरेश्वर, सुना, नातवंडे पतवंडे परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य (बारावा-तेरावा) ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबई येथील राहत्या घरी होणार आहेत.

## माजी मंत्री राजकुमार बडोलेंचे संगीत क्षेत्रात आगमन

■ 'डिव्हाइन सरेंडर' गाणे मान्यवरांच्या उपस्थितीत सादर

। मुंबई । प्रतिनिधी ।

संगीत, जागरुकता आणि आध्यात्मिकतेची सांगड घालणारे डिव्हाइन सरेंडर-द बुद्धिस्ट अँथम ऑफ पीस, अवेकनिंग अँड कंपॅशन हे गीत चर्चगेटमधील डाऊनटाऊन २० हॉल येथे आयोजित कार्यक्रमात अधिकृतपणे प्रकाशित करण्यात आले.



माजी मंत्री आणि विद्यमान आमदार राजकुमार बडोले यांनी लिहिलेल्या या गीतामध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी असलेल्या शांतता, आत्मबोध आणि करुणा या मूल्यांचा संदेश अंतर्भूत आहे. या गीतामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवलेले अभिनेते गगन मलिक यांनी प्रतिकात्मक भूमिका साकारली आहे, तर सुप्रसिद्ध बौद्ध संगीतकार पावा यांनी संगीतबद्ध आणि स्वरबद्ध केले असून ध्यान, संगीत आणि जागरूकतेचा अद्वितीय संगम साधत त्यांनी हे गीत अधिक प्रभावी केले आहे. या आध्यात्मिक निर्मितीमध्ये दिग्दर्शक निराज प्रभाकर यांनी कलात्मकतेची भर घातली आहे आणि युगंधर क्रिएशन्सच्या अनिकेत बडोले यांनी या गीताची निर्मिती केली आहे. हे गीत थाई, व्हिएतनामी, श्रीलंकन, कंबोडियन, बांगलादेशी अशा अनेक भाषांमध्येही प्रदर्शित करण्यात येणार आहे.

यावेळीरॉयलथाईकॉन्स्युलेट, मुंबईचे कॉन्सुल-जनरल डॉनाविट पूल्सवात आणि महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अतिथी म्हणून श्रीलंकेच्या कॉन्सुल-जनरल शिराणी अरियारत्ने, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे, सिद्धिविनायक सिने आर्ट्स (प्रा.) लिमिटेडच्या चेअरपर्सन कौशल्या विक्रमसिंघे, तसेच थायलंडचे उद्योजक आणि संशोधक अॅक्ट. कॅप्टन नट्टाकिट चायचलेर्ममोंग्खोन आणि युगंधर क्रिएशन्सचे निर्माते अनिकेत बडोले उपस्थित होते. तसेच या गीताचे संगीतकार व गायक पावा, ख्यातनाम अभिनेते गगन मलिक आणि 'डिव्हाइन सरेंडर' म्युझिक व्हिडिओचे दिग्दर्शक निराज प्रभाकर यांच्या उपस्थितीने या सोहळ्याची रंगत वाढली.

## आदिवासी बांधवांना फराळाचे वाटप

। खरोशी । प्रतिनिधी ।

दरवर्षीप्रमाणे यंदाही विश्व हिंदू परिषदेतर्फे पेण, रोहा आणि खालापूर या तालुक्यातील कातकरी आणि ठाकूर समाजाच्या एकूण १३० गावांमध्ये ७हजार ४०० पॅकेट्स फराळाचे वाटप केले, शिवाय इतर समाजाच्या सहा वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये फराळाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रभुदास घरत, कृष्णा वाघमारे, हिरामण म्हात्रे, निलेश सुतार, राजू पाटील, जयंतीलाल मालवीय, विष्णू पवार, समीर नागोठकर, उदय पाटील, जनार्दन नाईक, मयूर नाईक आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या कातकरी आणि ठाकूर बंधूंना दिवाळी आनंदाची जावी,त्यांच्या घरामध्ये तयार न होणारे फराळाचे पदार्थ त्यांना खायला मिळावेत म्हणून दिवाळी सण मोठा नाही आनंदाचा तोटा या उक्तीप्रमाणे खरवली, निगडे, कारली, कामार्ली, सावरसई मोहाडी यासह अनेक आदिवासी वाड्यांमध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये विश्व हिंदू परिषदेच्या ४२ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.



## गायब नेते पुन्हा दिसणार?

### उरणकरांचा संताप व्यक्त

। उरण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे आरक्षण अखेर जाहीर झाले आहे. मात्र, आरक्षणाच्या गदारोळात एक प्रश्न मात्र जनतेच्या मनात ठळकपणे उभा राहतो; तो म्हणजे मागील निवडणुकीत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा कार्यअहवाल कुठे आहे? मागील निवडणुकीत आश्वासनांचा पाऊस पाडणारे, मतांसाठी गल्लीबोळ फिरणारे अनेक लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर अक्षरशः 'गायब' झाले. इतकेच नव्हे तर, काहींचा चेहराही मतदारांना ओळखू येणार नाही इतकी परिस्थिती निर्माण झाली आहे. काही प्रतिनिधींनी तर पाच वर्षे मतदारसंघात पाऊल ठेवले नाही. जनतेने समस्या मांडायला गेलं की उलट त्यांच्यावरच चीड काढली जाते, ''मतदानाचे पैसे घेतलेत, मग कामाची अपेक्षा कशाला करता?'' अशी निर्लज्ज टोमणेबाजी काहींकडून होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पान १ वरून

## मासेमारी बोटी माघारी परतल्या

नवरात्री व दिवाळीनंतर पुन्हा खवय्यांनी माशांवर ताव मारण्यास सुरुवात केली होती.

पावसाळ्यात ६० दिवस मासेमारी बंद होती. १ ऑगस्टपासून पुन्हा हंगाम सुरू झाला. मात्र, खराब हवामान, विविध वादळांमुळे हवामान विभागाने आठ वेळा धोक्याचा इशारा दिला. किमान २०-२२ दिवस मासेमारी बंद ठेवावी लागली होती. यादरम्यान मासळीची आवक कमी झाल्याने भाव गगनाला भिडले होते. मच्छिमारांना फटका बाजारात मासळीला उठाव नाही. याचा मच्छिमारांना चांगलाच फटका बसला आहे. त्यामुळे बाजारात विक्रीतून मिळणाऱ्या जास्त भावापेक्षा कमी भावाने पॅकिंग कंपन्यांना मासळी विकण्याची वेळ येथील मच्छिमारांवर येऊन ठेपली आहे.

मासेमारी व्यवसाय हा शेतकऱ्या सारखा बनला आहे. पीक आलं की नुकसान होतं. त्याप्रमाणे नवीन मासळीचा हंगाम सुरू झाला की, वादळ येते. आता नवव्या वेळेला हे संकट मच्छिमारांवर आले आहे. त्यामुळे मच्छिमार आर्थिक संकटात आला असल्याची माहिती करंजा मच्छिमार संस्थेचे माजी उपाध्यक्ष व मासळी व्यावसायिक रमेश नाखवा यांनी दिली आहे.

## जंजिऱ्याचे दरवाजे बंद

आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची रेलचेल दिसून येत होती. मुरुडमधील सर्व हॉटेल्स, लॉज हाऊसफुल्ल झाल्याने पार्किंग ठिकाणीच अनेकांनी रात्र काढली. मात्र, अवकाळी पावसामुळे पर्यटकांच्या आनंदावर विरजण पडले. अचानक आलेल्या या पावसामुळे बंदर खात्याने जलवाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अनेकांना जंजिरा किल्ला पाहता आला नाही.

## आयोगाविराधात डावे पक्षही रस्त्यावर उतरणार

दिवसाउजेडी घातलेला दरोडा आहे. राज्य आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी निवडणूक यंत्रणांना हाताशी धरून ही निवडणूक एकतर्फी करण्याचा कट आखला आहे, आणि म्हणूनच मतदार याद्या दुरुस्त झाल्याशिवाय निवडणूक नको, ही भूमिका सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम या मोर्चाच्या तयारीकरीता राबविण्यात येणाऱ्या राज्यव्यापी प्रचार मोहिमेच्या माध्यमातून करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

## भरकटलेला बोया श्रीवर्धन समुद्रकिनारी

समुद्रातून वरती खेचण्याकरिता ओहोटीच्या वेळेस बार्ज ला बोया बांधून भरतीचे वेळेस पाण्यातून बार्ज बाहेर काढता येईल यासाठी बोया बांधला होता. परंतु , हवामान खराब असल्याने बोयाचा दोर तुटून समुद्रात वाहून गेला. हा बोया आज सकाळी श्रीवर्धन येथील किनाऱ्याला लागला

बोयाचा उपयोग बोट सुरक्षित ठेवण्यासाठी बोटीच्या बाजूंना लावण्यात येतो, तसेच एखादी लहान मोठी बोट बुडाली असेल तर त्या समुद्रातून वरती खेचण्यासाठी बलून सारखा उपयोग केला जातो.अशी माहिती श्रीवर्धन येथील मच्छिमार व्यवसायिकांनी दिली.अब्दुल रजाक अन्सारी(मुंबई) यांच्या मालकीचा बार्ज असून , २० आक्टोबर रोजी बाणकोट येथे पुलाच्या पिलरचे काम चालू असताना बुडालेल्या बार्जला पाण्यातून वरती खेचण्याकरिता त्यांनी बोया भाड्याने घेतला होता.परंतु , वातावरण खराब असल्यामुळे सदरील बोया तुटून समुद्रात भरकटला होता. त्यामुळे श्रीवर्धन परिसरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी केले आहे .

## अलिबाग-वडखळ मार्गावर वाहतूककोंडी

मंदावला असून, त्यामुळे कोंडी आणखी वाढली आहे.

वाहतूक पोलिसांनी तातडीने गस्त वाढवून वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. स्थानिक प्रशासनाने महामार्ग दुरुस्ती आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी अतिरिक्त पथके नेमण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. पर्यटकांची वाढती संख्या, अरुंद रस्ते आणि अपुरी वाहतूक व्यवस्था यामुळे अलिबाग-वडखळ महामार्गावरील कोंडी ही दर सुटीला उद्भवणारी समस्या बनली असून नागरिकांनी संयम बाळगावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## 'बळी'राजाची झोळी रिती

करण्यात आली. मात्र, रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. कधी ऊन, तर कधी ढगाळ वातावरण होत आहे. रात्री विजांच्या कडकडाटांसह पाऊस पडत आहे. या पावसामुळे अनेक भागातील भातपीक आडवे झाले आहेत. पावसाचे पाणी सखल भागात साचले आहे. त्यामुळे भातपीक अडचणीत येण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तयार झालेल्या पिकाची कापणी पावसामुळे करण्यास अडथळा निर्माण झाला आहे. पावसामुळे भात कापणी लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दिवाळीपर्यंत ५० टक्क्यांपर्यंत भातकापणीची कामे पूर्ण होण्याची अपेक्षा होती. परंतु, पावसामुळे ही कामे पुढे जाण्याची शक्यता आहे. काही शेतकऱ्यांनी कापणी करून भाताची रोपे सुकविण्यासाठी शेतात ठेवल्याने तीदेखील पाण्यास भिजून गेल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. भातपिकांवर तुडतुड्या व इतर किडरोगाचा प्रादुर्भाव सुरु झाला असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

## व्यापारी संकुल ठेकेदाराच्या घशात घालण्याचा डाव

आणि जिल्हा परिषद का पाळत नाहीत? असा प्रश्न टपरी धारक उपस्थित करीत आहेत.

नेरळ संकुल प्राधिकरणाने नेरळ बाजारपेठेत व्यापारी संकुल बांधले आहे. या संकुलाचे बांधकाम २०२२ मध्ये पूर्ण झाले असून, मागील तीन वर्षे संकुल बंद आहे. रायगड जिल्हा परिषदेत सदस्य मंडळ नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संकुलातील गाळ्यांचे वाटप केले जात नव्हते. साधारण अडीच कोटी खर्चून बांधलेले या संकुलातील गाळ्यांचे वाटप नेरळ बाजारपेठेमधील रस्ता रुंदीकरण करताना रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या टपरीधारक यांना देण्यात येणार होते. रस्त्यावरील टपऱ्या तोडण्यात आल्यानंतर नेरळ गावातील रस्ते तयार करण्यात आले. मात्र, त्यामुळे नेरळ गावातील बाजारपेठेमधील वाहतूक कोंडी टपरीधारकांकडून फूटपाथ अडवल्याने आजही कायम आहे. बांधण्यात आलेल्या व्यापारी संकुलात अद्यापपर्यंत टपरीधारकांना गाळे देण्यात आले नाहीत. गाळे मिळावे यासाठी अनेक वेळा टपरीधारक नेरळ ग्रामपंचायत आणि रायगड जिल्हा परिषदेमध्ये जाऊन आले आहेत.त्या त्या वेळी सदस्य मंडळ नसल्याने व्यापारी संकुलातील गाळ्यांचे वितरण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला जात नाही, असे सांगितले जात होते.

## नागाव ग्रामपंचायतीत लाखोंचा भ्रष्टाचार?

स्थानिक सत्ताधाऱ्यांचे आणि ग्रामसेवकांचे थेट संगनमत असल्याची कुजबूज आहे.

उरण तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये सध्या हाच प्रकार सुरू असल्याचे वास्तव उघड होत आहे. स्वतः सत्ताधारी आणि ग्रामसेवक मंडळी आपल्या ओळखीच्या लोकांना पुढे करून कामे व साहित्य खरेदी करतात आणि त्यातून मोठा गोलमाल करतात. अनेक ग्रामसेवक व पदाधिकारी यांच्या मालमत्ता आता कोट्यवधी रुपयांच्या घरात गेल्याचे उघड झाले आहे. भ्रष्टाचार इतका खोलवर रुजला आहे की, ''गावाच्या विकासाचा पैसा थेट सत्ताधाऱ्यांच्या खिशात जातो'', असेच चित्र निर्माण झाले आहे.

याबाबत अनेक वेळा उरण पंचायत समितीत लेखी तक्रारी सादर करण्यात आल्या, लेखाजोखा मांडला गेला, मात्र तक्रारदारांचे अर्ज निकाली काढून प्रकरणे दडपली गेली. उलटपक्षी, भ्रष्टाचार उघड करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना धमक्या दिल्या जात आहेत. काही तक्रारदारांनी तर थेट आरोप केला आहे की, ''उरण पंचायत समितीतील काही अधिकारी वर्गाचे भ्रष्ट ग्रामसेवकांसोबत उठबस आहे. त्यामुळे कारवाईऐवजी संरक्षण दिलं जातं''

या सर्व परिस्थितीमुळे उरण तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये भ्रष्टाचाराचे साम्राज्य वाढत चालले आहे. नागाव प्रकरणातील चौकशी आदेशामुळे मात्र या भ्रष्ट साखळीवर आघात बसण्याची शक्यता आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. जर या चौकशीचं पाणी फक्त फाईलपुरतं राहिलं, तर जनता रस्त्यावर उतरेल. जनतेच्या पैशाचा हिशोब दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी आदेशात नमूद केले आहे की, चौकशी अहवाल तातडीने रायगड जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक असल्याचा आदेश जारी करण्यात आला आहे. हा आदेश म्हणजे भ्रष्ट ग्रामपंचायतींना मिळालेला थेट दणका आहे. याबाबत पुढील काय कारवाई होते की यावर पडदा पडतो याकडे उरणच्या जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.

## माथेरानच्या राणीला पावसाचा अडसर

मिनीट्रेन मार्गातील माथेरान परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे रेल्वे मार्गावर अनेक ठिकाणी माती वाहून गेली असून, कड्यावरचा गणपती परिसरात मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले आहे. याठिकाणी रेल्वे ट्रॅकखालील भाग कमकुवत झाल्याने सुरक्षा भिंत उभारण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. पावसामुळे कामाचा वेग मंदावला असून, रेल्वे विभागाने या अडथळ्यांवर मात करण्यासाठी गती दिली आहे.

नेरळ स्थानकाचे स्टेशन मास्तर गुरुनाथ पाटील यांनी अलीकडेच माथेरान मार्गावरील रेल्वे स्थानकांची पाहणी केली. त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलणे टाळले असले तरी, ''मिनी ट्रेन लवकर सुरू करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. काही महत्त्वाची कामे मार्गी लागल्यानंतर मालवाहू ट्रेनची ट्रायल घेतली जाईल आणि त्यानंतरच अधिकृत घोषणा होईल,'' अशी माहिती त्यांनी दिली.

**थंड हवा आणि मुसळधार पावसाचा दुहेरी अनुभव**

सध्या माथेरानचा हिवाळी हंगाम सुरू झालेला आहे. या हंगामात पर्यटकांना एकाच वेळी दोन अनुभव घेता येतात. एकीकडे मुसळधार पावसाचा, तर दुसरीकडे थंडगार हवेचा. काही पर्यटक या दुहेरी वातावरणाचा आनंद घेत आहेत, तर काहींना पावसामुळे झालेल्या अडचणींचा त्रास सहन करावा लागत आहे. तरीही माथेरानच्या निसर्गसौंदर्याने पर्यटकांना आकर्षित केले आहे. पावसाळ्यात दगड, गोटे आणि माती घसरण्याची शक्यता लक्षात घेऊन ''कोणीही घाटातून रेल्वेमार्गावर जाऊ नये, अन्यथा कारवाई केली जाईल,'' असा इशारा देणारा फलक वॉटर पाईप स्थानकाजवळ लावण्यात आला होता. मात्र हा फलक नेमका कोणी लावला याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

रेल्वे विभागाच्या सुरू असलेल्या दुरुस्ती व सुरक्षाविषयक कामांमुळे ट्रेन सुरू होण्यास विलंब झाला असला तरी, ही कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. त्यामुळे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात नेरळमाथेरान मिनी ट्रेन पुन्हा एकदा पर्यटकांच्या दिमतीला धावेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकती आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) अरुणा जगदिश जोशी<br>२) रचना जगदिश जोशी<br>३) निखिल जगदिश जोशी | १ | ७ | ०-२७-६० | १.७५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २७/१०/२०२५

**अॅड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**अॅड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो. : ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## निवडक

### महिलेचा खून करून दागिने लंपास

**पनवेल :** एका अज्ञात व्यक्तीने एका महिलेचा गळा दाबून खुन करून तिचे दागिने लंपास केल्याची घटना पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावात घडली आहे. मळिालेल्या माहितीनुसार, संगीता नामदेव म्हात्रे (५५) असे या महिलेचे नाव आहे. त्या आपल्या घरी असताना एका अज्ञात व्यक्तीने चोरी करण्याच्या उद्देशाने त्यांचा गळा दाबून खून केला. त्यानंतर महिलेच्यघरातील सोन्याची चेन, मंगळसूत्र, अंगठ्या व कानातले असा मळ्िून जवळपास १ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांची वेगवेगळी पथके आरोपींच्या शोधात रवाना झाली आहेत. तसेच, काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### अनिमेष ओझे यांच्या सतर्कतेमुळे जीव बचावला

**पनवेल :** पनवेलमधील सामाजिक कार्यकर्ते अनिमेष अमित ओझे यांच्या सतर्कतेमुळे एका जखमी व्यक्तीचा जीव बचावला आहे. शहरातील वडाळे तलाव परिसरात आर्थिक देवाण घेवाणाच्या वादातून दोघांमध्ये चांगलेच वाद-विवाद झाले. यावेळी एकाने त्याच्याकडे असलेल्या धारदार चाकूने दुसऱ्या व्यक्तीला जखमी करून तो पळून गेला. त्याचवेळी त्या परिसरातून अनिमेष ओझे तेथून जात असताना घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी जखमी झालेल्या व्यक्तीला तातडीने लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तसेच, याबाबतची माहिती पोलिसांना दिली. जखमी रुग्णाला त्वरित उपचार मळिाल्याने त्याच्या नातेवाईकांनी अनिमेष ओझे यांचे आभार मानले.

### घरातून मोबाईल, लॅपटॉपची चोरी

**नवीन पनवेल :** एका चोरट्याने घरात प्रवेश करून दोन मोबाईल आणि लॅपटॉप चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंजाडे सेक्टर दोन येथील केदार चौधरी हे सकाळी दिवाळी पहाट कार्यक्रम पाहून घरी आल्यावर घरातील साफसफाई करत होते. त्यावेळी त्यांनी हॉलमधील टीपॉयवर लॅपटॉप आणि दोन मोबाईल ठेवले होते. त्यावेळी त्यांचा दरवाजा उघडा होता. दरम्यान, ते किचनमध्ये गेले असताना एक चोरटा हॉलच्या दरवाज्यातून पळून जाताना दिसला. त्यावेळी लॅपटॉप आणि दोन मोबाईल फोन दिसून आले नाहीत.

### अवकाळी पावसाने मजुरी दर गगनाला भिडले

**वडखळ :** रायगड जिल्ह्यातील भातशेती निर्णायक टप्प्यात आली असताना परतीच्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. ऐन दिवाळीत कापणी-मळणीचे काम सुरू असून शेतकऱ्यांची दिवाळी शेतातच सुरू आहे. मात्र, पाऊस आणि शेतमजुरांच्या टंचाईमुळे भात कापणीचा वेग मंदावल्याने धान्याच्या नुकसानीचा धोका वाढला आहे. औद्योगिकीकरणाच्या वाढत्या संधीमुळे अनेक मजूर शहरांकडे वळल्याने शेतीकामासाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. ज्या मजुरांची उपलब्धता आहे, त्यांची मजुरी ६०० ते ८०० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मजुरांची मनधरणी करावी लागत आहे. सूर्याचा प्रखर तडाखा आणि ओलसर शेतांमुळे मजूर कापणीस नकार देत आहेत, यामुळे अडचणी अधिक वाढल्या आहेत. भात परिपक्व अवस्थेत आल्यानंतर मोठ्या उत्साहात कापणी सुरू झाली होती. परंतु, अवकाळी पाऊस आणि ऑक्टोबर हिट यामुळे भाताच्या लोंब्यांमधून दाणे सुटू लागल्याने उत्पन्नात मोठ्या नुकसानाची शक्यता निर्माण झाली आहे. दुर्गम भागांतील मजूर दिवाळीपूर्वी आपल्या गावाकडे परतत असल्याने कापणीचे नियोजन कोलमडत आहे. काही भागात मजूर उपलब्ध नसल्याने घरच्या घरी कापणीचे काम करण्यात येत आहे. पेण तालुक्यात तर अनेक ठिकाणी कापलेला भात पावसाने भिजला असून काही पिके कोसळल्याने कुजण्याचा धोका निर्माण झाला आहे. निसर्गाच्या लहरीपणाने आणि मजुरांच्या टंचाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी जोर धरू लागली आहे. कोकणातील शेतकऱ्यांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून शासनाने विदर्भ-माराठवाड्याप्रमाणे तातडीने मदत द्यावी, अशी एकमुखी मागणी शेतकरी करीत आहेत.

### मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. महेंद्रप्रसाद रामस्वरुप अवस्थी (६३) असे त्याचे नाव असून तो मालधक्का रोड येथील रहिवाशी आहे. त्याची उंची ५ फुट २ इंच, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे पांढरे-बारीक, दाढी मिशी काळी पांढरी वाढलेली आहे. या व्यक्तीच्या नातेवाईकांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरिक्षक.प्रज्ञा मुंढे (७६६६११४८७४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक न्याय भवन दुर्लक्षित



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वंचित घटकांच्या सर्वांगिण विकासासाठी गोंधळपाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्यात आले होते. परंतु, काही वर्षातच ही इमारत धोकादायक झाल्याने येथील अनेक कार्यालये पुर्ण खाली करण्यात आली. मात्र, या इमारतींच्या दुरुस्तीसह नुतनीकरणाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठ फिरविल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे सार्वजनिक न्याय भवन दुर्लक्षीत झाले असून एका छताखाली मळिणाऱ्या सुविधांपासून मागासवर्ग दुरावला आहे.

अनुसूचित जाती, नवबौध्द घटकांच्या सामाजिक, शैक्षण्कि व आर्थिक उन्नतीसाठी सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभागामार्फत अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्यात आले. त्यासाठी सुमारे ७ कोटीहून अधिक रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. या इमारतीचा उद्घाटन सोहळा १५ ऑगस्ट २०१४ रोजी झाला. त्यात तळमजल्यावर मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र

- **मागास वर्गातील विकासाला आडकाठी**
- **नुतनिकरणाकडे बांधकाम विभागाची पाठ**

राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, संत रोहीदास चर्माद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महांडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ही सहा कार्यालये, पहिल्या मजल्यावर समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, सभागृह व कर्मचाऱ्यांचे कार्यालय आणि दुसऱ्या मजल्यावर जात पडताळणी कार्यालय सुरु करण्यात आले. या इमारतीतून वंचित घटकांचा सर्वांगिण विकास होण्याची आशा पल्लवीत झाली होती. परंतु, उद्घाटन होऊन अवघ्या चार वर्षातच इमारतीचा स्लॅब कोसळू लागला, भिंतीना तडे पडू लागले, पावसाळ्यात गळती होऊ लागली. त्यामुळे ही इमारत अनेक समस्यांच्या गर्तेत सापडली.

> **गोंधळपाडा येथे उभारण्यात आलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामजिक न्याय भवनची इमारत जीर्ण झाली आहे. त्या इमारतीच्या जागी नवीन इमरीत बांधण्याची कोणतीही हालचाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिसून येत नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. एका छाताखाली योजनांसह विविध शासकिय कामे मागासवर्गीय घटकांची होत असत. परंतु, आता कार्यालये विखुरल्याने नागरिकांसह विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होत आहे. सार्वजिक बांधकाम विभागाने ही इमारत बांधण्यासाठी हालचाल सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.**
> **– प्रदिप ओव्हाळ, अध्यक्ष, भारिप बहुजन महासंघ, रायगड**

तसेच, इमारतीमध्ये काम करणारे कर्मचारी, कामानिमित्त येणार विद्यार्थी व नागरिकांची सुरक्षा धोक्यात येण्याची भिती निर्माण झाली होती. स्ट्रक्चरल ऑडीटनंतर इमारत धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे संपुर्ण कार्यालय खाली करण्याची वेळ आली. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून ही कार्यालये खासगी जागांमध्ये भाडे तत्वावर कार्यरत आहेत. त्याचा नाहक त्रास वंचित घटकांसह कर्मचाऱ्यांना होत आहे.

> **सामाजिक न्याय भवन इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. परंतु, समाजकल्याण विभागाकडून त्यास नकार देऊन नव्याने इमारत बांधण्याची मागणी केली आहे. त्यामुळे दुरुस्तीचे काम थांबले आहे.**
> **–विनायक तेलंग, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

गेल्या तीन वर्षांत सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारतीच्या दुरुस्तीसह नुतनीकरणाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे ही इमारत दुर्लक्षीत झाली आहे. नव्याने इमरी बांधण्याच्या भमिकेकडे देखील दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय भवनची जागा पडिक होऊ लागली आहे. त्याठिकाणी गवत व विषरी प्राण्यांचा वावर वाढू लागला आहे. दरम्यान, या इमारतीच्या नुतनीकरणाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठ फिरविल्याने मागास घटकांच्या विकासाला अडकाठी आल्याचे बोलले जात आहे.

# पनवेल पालिकेच्या कामांची दुरवस्था



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमध्ये महानगरपालिके तर्फे माठ्या प्रमाणात विकासकामे होताना दिसत आहेत. काही ठिकाणी कामे चालु आहेत, तर काही ठिकाणची कामे पुर्ण होऊन उद्घाटनही झाली आहेत. परंतु, उद्घाटन झाल्या नंतर आपली जबाबदारी संपली, अशी मनस्थिती सध्या पालिकेची दिसत आहे. येथील गार्डन हॉटेल ते ठाणा नाका फूटपाथचे काम पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन होऊन त्याचा वापर देखील होत आहे. परंतु, एक वर्षाच्या आतच या फुटपाथवरील रंगीत पेवर ब्लॉक खचले आहेत. त्यामुळे कामाच्या दर्जेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तसेच, अशा कामांच्या दुरूस्तीची जबाबदारी नक्की कोणाची? पनवेल पालिकेचे अधिकारी या कामांची पाहणी करतात की नाही? वेळेवर टॅक्स भरून देखील आमच्या वाटेला असा त्रास का? असे स्थानिकांमधून प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच, या निकृष्ठ कामांवर कारवाई होणार का, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.

# उलवे येथील तरुण बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



मित्राबरोबर फेरफटका मारुन येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक तरुण अद्याप घरी परतला नाही. त्यामुळे हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सुधीर शशिकांत मिसले (२६) असे त्याचे नाव असून उंची ५ फुट २ इंच, रंग गोरा, बांधा मध्यम, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे, दाढी मिशी बारीक असून अंगात लाल रंगाचा हाफ बाह्याचा टी-शर्ट व राखाडी रंगाची ट्रॅक पॅन्ट तसेच पायात हिरव्या रंगाची चप्पल आहे. त्याला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने उलवा पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार धनाजी डांगे यांच्याशी संपर्क साधावा.

# मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारतीय नौदलाच्या नेव्ही वीक सेलिब्रेशन २०२५ चा एक भाग म्हणून, आयएनएचएस संधानी आणि नेव्हल स्टेशन करंजा यांच्यातर्फे उरण आणि आसपासच्या गावातील रहिवाशांना मोफत आरोग्य सेवा आणि सल्ला देण्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबीर सोमवारी (दि.२७) उरण येथील पालक मैदानातील उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूलमध्ये होणार आहे. या शिबिरात रहिवाशांना वैद्यकीय तज्ज्ञ, दंतवैद्य, शल्यचिकित्सक, स्त्रीरोग तज्ञ, बालरोगतज्ज्ञ, इएनटी विशेषज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ आणि त्वचारोग तज्ज्ञ यांच्याशी विविध वयोगटातील आरोग्यविषयक समस्या आणि वैद्यकीय गरजाशी संबंधित सल्लाम सलत करता येणार आहे. तज्ज्ञांच्या सल्ल्याव्यतिरिक्त, औषधे आणि रक्त तपासणी यासह आवश्यक मोफत सेवा प्रदान केल्या जातील. तरी या शिबिराचा लाभ सर्वांनी घेण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



मुरूडहून रोह्याकडे गारंबीमार्गे जाणाऱ्या रस्त्यावरील गावे हिरवाईने नटलेले दिसत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# लोखंडी रॉडने केली मारहाण

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

मद्य पिण्याची परमिशन कोणी दिली, असे विचारून हाताने आणि लोखंडी रॉडने म ारहाण केल्याची घटना कळंबोली येते घडली आहे. या प्रकरणी कळंबोली येथील करण नाईक व अनोळखी व्यक्तीच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मळिालेल्या माहितीनसुर, कृष्णकांत कंठाळे हे कळंबोली सेक्टर चार येथे राहत असून ते मित्रांसह मॅकडोनाल्ड शेजारील गॅरेजच्या जवळ मद्यपिण्यासाठी बसले होते. यावेळी अमन यादव तेथील खुर्चीवर मद्य पीत बसला होता. त्यावेळी करण नाईक आणि एक अनोळखी व्यक्ती त्या ठिकाणी आले आणि तुम्ही येथे मद्य प्यायला कसे बसला, तुम्हाला येथे बसण्याची परवानगी कोणी दिली, असे बोलून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली. त्यानंतर गॅरेज जवळील लोखंडी रॉडने त्यांच्या कपाळावर वार केले.

# थुंकण्याच्या कारणावरून हेल्मेटने मारहाण

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

थुंकण्याचे कारण विचारले असता चौघांनी धक्काबुक्की करून हेल्मेटने एका तरुणाला मारहाण केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मळिालेल्या माहितीनुसार, विक्रांत ठाकूर हा रिसि गाव-रसायनी येथे राहत असून २३ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास अभिनव जाधव यांच्यासोबत मोटरसायकलने पनवेलमधील ओएनजीसी सिग्नलजवळ आला. यावेळी बाजूला उभी असलेल्या इनोवा कारमधील एक व्यक्ती गाडी बाहेर थुंकला आणि ते विक्रांतच्या अंगावर उडाले. यावेळी दोघांनीही गाडी बाजूला घेतली. त्यानंतर कारमधून चार व्यक्ती खाली उतरले आणि विक्रांत जवळ आले. विक्रांतने त्यांना थुंकण्याचे कारण विचारले असता त्यांच्यात धक्काबुक्की झाली. यावेळी एकाने हेल्मेट घेऊन विक्रांतला मारहाण केली. त्यात तो जखमी झाला. त्यानंरत कारचालकांसह अन्य व्यक्तींनी तेथून पळ काढला.

**परतीच्या पावसाचा वाहतुकीवर परिणाम** | **महामंडळावर प्रवासी बोटी बंदीचा भार**

# अलिबाग एसटी स्थानकात पर्यटकांची गर्दी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**






दिवाळीच्या सुट्टीनंतर पर्यटक परतीच्या मार्गावर निघाले आहेत. रविवारी परतीच्या मार्गावर असलेल्या प्रवाशांनी अलिबाग स्थानकात प्रचंड गर्दी केली होती. पनवेलपर्यंत जाण्यासाठी विना थांबा बसचे तिकीट काढण्यासाठी अलिबाग स्थानकात भलीमोठी रांग लागली होती.

दिवाळीची सुट्टी पडल्याने पर्यटक अलिबागमध्ये दाखल झाले आहेत. काहीजण मित्रमंडळींसह तर काहीजण कुटूंबियांसमवेत अलिबागमध्ये फिरण्यासाठी आले होते. यावेळी अलिबागसह वरसोली, नागांव, समुद्रकिनारी पर्यटकांनी अलोट गर्दी केली होती. सुट्टीचा हंगाम संपल्यानंतर पर्यटक रविवारी (दि.२६) दुपारपासून परतीच्या मार्गावर निघाले. परंतु, गेल्या चार दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाने येथील जनजीवन विस्कळीत झाले असून रविवारी दुपारपासून पावसाने सुरुवात केल्याने परतीच्या मार्गावर लागलेल्या पर्यटकांची तारांबळ उडाली. वाहतुकीवरही त्याचा मोठा परिणाम झाला. दरम्यान, अलिबाग-वडखळ मार्गावर वाहतूक कोंडीशी सामना करण्याची वेळ प्रवाशांसह पर्यटकांवर आली होती.

तसेच, पावसामुळे प्रवासी बोटी बंद असल्याने एसटीवर त्याचा भार पडला. अलिबाग एसटी स्थानकात तिकीट काढण्यासाठी पर्यटकांची रांगच रांग दिसून आली. परंतु, पनवेलकडे जाणारी विना थांबा बस वेळेवर लागली नसल्याने प्रवाशांना तासनतास स्थानकात उभे राहवे लागले. प्रवाशांच्या गर्दीचा विचार करता, अलिबाग एसटी आगाराने ज्यादा बसेसची व्यवस्था केली आहे. परंतु, वाहतूक कोंडीमुळे अनेक बसेस रस्त्यातच अडकल्यामुळे त्यांना निश्चित स्थळी वेळेवर पोहचण्यास विलंब झाला. त्यामुळे अलिबाग स्थानकातून ज्यादाबसेस उशीरा सुटल्याचे चित्र दिसून आले.

> **प्रवाशांच्या गर्दीचा विचार करता, ज्यादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु, वाहतूक कोंडीमुळे अनेक बसेस रस्त्यातच अडकल्या. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून ज्या बसेस येतील त्यामध्ये प्रवाशांना बसवून त्यांच्या निश्चित स्थळी सोडण्याचा प्रयत्न केला गेला.**
> **– राकेश देवरे, आगार व्यवस्थापक, अलिबाग**

# दिवाळी संध्याने रसिक मंत्रमुग्ध




**। रोहा । प्रतिनिधी ।**

सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान तर्फे शनिवारी (दि.२५) रात्री दिवाळी संध्याचे आयोजन केले होते. संगित एक्सप्रेस मुंबई कृत भावगीत व लोकगीत गाणी सादरीकरणातून दिवाळी संध्याने उपस्थित रोहेकर रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. चंद्र आहे साक्षीला, गोमू संगतीनं यांसह एकापेक्षा एक सरस गाण्यांनी गोड दिवाळी संगीतमय झाल्याचे अधोरेखीत झाले. कार्यक्रमात शिक्षक गुरुजन, सह्याद्री वन्यजीवन रक्षणार्थ सामाजिक संस्था, सिटी ऑफ फ्लॉवर्स, पोलीस निरीक्षक मारुती पाटील आदी संस्था, आदर्श व्यक्तींचा सन्मान यावेळी करण्यात आला. तसेच, रील स्पर्धा, लकी ड्रॉ व मनोरंजन कार्यक्रमातून दिवाळी संध्याला अधिकच रंगत आली.

# गृहमंत्र्यांना हटवा

महाराष्ट्र राज्याला पूर्ण वेळ काम करू शकणारे गृहमंत्री हवे आहेत. पोलिस दलातील मग्रुरी, भ्रष्टाचार मोडून काढण्याची सवड आणि हिंमत त्याला दाखवावी लागेल. सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्याची स्वतःची नियत साफ असेल तरच तो हे करू शकेल. तसे राज्यात सध्या देवेंद्र फडणवीस नावाचे एक गृहमंत्री आहेत. पण एकाच वेळी ते अनेक उद्योगांमध्ये व्यग्र असतात. मुख्यमंत्री म्हणून बिल्डर वगैरे मंडळींच्या परिषदांमध्ये सतत भाषणे करणे, मुंबईत आणखी कोणत्या नव्या मेट्रो, जमिनीखालून रस्ते किंवा आकाशातल्या इमारती उभारता येतील हे पाहणे, अदानी वगैरेंसारख्यांना काही तोशीस होत नाही ना हे पाहणे, गडचिरोलीमध्ये त्यांच्या पोलाद प्रकल्पाचे काम मार्गी लावण्यासाठी स्थानिक विरोध मोडून काढणे, त्यासाठी जनसुरक्षासारखे कायदे आणणे, शक्तीपीठसारख्या कल्पना मांडून ग्रामीण जीवनाची वाट लावणे, त्याच्या विरोधात असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये फूट पाडणे, विरोधकांवर काही ना काही खटले दाखल करणे, रोज किमान एकदा उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर टीका करणे, राहुल गांधी यांनी काहीही आरोप केले की महाराष्ट्राचा संबंध असो वा नसो त्यांच्या डोक्यात बिघाड आहे असे खालच्या पातळीवरचे आरोप करणे अशी बरीच कामे फडणवीससाहेबांना करावी लागत असतात. त्यामुळे राज्यातील गृह खात्याच्या कारभारात ते स्वतःच्या जरुरीपुरतेच लक्ष घालतात. भीमा कोरेगावसारखे खटले दाखल करायचे असतील, त्यातले संभाजी भिडे व एकबोटेवरचे आरोप काढून टाकायचे असतील तर ते एकदम सक्रीय असतात. आपले स्वपक्षाचे आमदार व मंत्री मुस्लिमांवर बहिष्काराचे हाकारे घालत असले तरी त्यांच्याशी पोलिसांनी प्रेमाने वागावे याची ते आवर्जून काळजी घेतात. याउलट कोण्या पोरासोरांनी औरंगजेब वा टिपू सुलतानाचा फोटो डीपी म्हणून ठेवला की त्यांचा पारा चढतो व औरंगजेबाच्या औलादी नष्ट करण्याचा ठाम निर्धार ते प्रकट करतात. नागपुरच्या दंगलीत विशिष्ट आरोपींच्या घरांवर बुलडोझर लावला जाईल याची तजवीज केली जाते. पण दुसऱ्या विशिष्ट आरोपींना तात्काळ जामीन मिळेल हे पाहिले जाते.

## फलटणमधील लज्जास्पद प्रकार

फडणवीस हे अशा अनेक उद्योगांमध्ये अडकलेले असल्याने त्यांच्या अमलात सारखे काही ना काही गुन्हे घडत राहतात आणि त्यावरून मग आरडाओरडा होत राहतो. जसे की सध्या गाजत असलेले फलटणच्या महिला डॉक्टरच्या आत्महत्येचे प्रकरण घ्या. सरकारी सेवेत कंत्राटी रीतीने काम करीत असलेली ही महिला डॉक्टर स्वतःच्या इच्छेने देवाघरी गेली. पण जाताना फडणवीसांच्या अखत्यारीतील पोलिसांवर काही आरोप करून गेली. आरोपींच्या वैद्यकीय तपासणीचे अहवाल पोलिसांना हवे तसे देण्याचा दबाव सरकारी डॉक्टरांवर असतो हे सांगून गेली. आरोपी आजारी असूनही तो फिट असल्याचे प्रमाणपत्र देण्याचा आपल्यावर वारंवार दबाव टाकण्यात आला, याबाबत आपण पोलिस उपअधीक्षकांकडे तक्रार करूनही काही उपयोग झाला नाही असे या महिला डॉक्टरने लिहिले आहे. शिवाय स्थानिक पोलिस गोपाल बदाने याने आपल्यावर अत्याचार केल्याचा आरोपही तिने केला आहे. प्रशांत बनकर याच्यावरही काही आरोप आहेत. बाकी तपास काय तो होईलच. पण या घटनेतल्या दोन गोष्टी लक्षवेधक आहेत. मूळची बीड जिल्ह्यातून आलेली ही महिला डॉक्टर नीटच्या परिक्षेत उत्तम गुण मिळालेली म्हणजेच हुशार होती. शिवाय तिने आजवर ७०-८० पोस्टमार्टेम केली होती. म्हणजे ती काही कच्च्या दिलाची नव्हती. तरीही ती निव्वळ पोलिसांच्या दबावाखाली येऊन आत्महत्येकडे जात असेल तर ते भयंकर आहे. आपल्यावर प्रचंड ताण असल्याचे तिने वारंवार घरच्यांना सांगितले होते. याची तक्रारही तिने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे केली होती. पण त्यांनी दुर्लक्ष केले होते. पोलिस दलामध्ये किती अंदाधुंदी आणि मस्ती वाढलेली आहे याचे हे उदाहरण आहे. साध्या पोलिस उपनिरीक्षकावर वरच्या अधिकाऱ्यांचा वचक नाही किंवा तेही यामध्ये त्या पोलिसालाच सामील असावेत असा हा प्रकार आहे. यावर कोणाचेच लक्ष नाही कारण, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे भलभलत्या इतरच उपद्व्यापात अडकलेले आहेत. शिवाय आपल्या ठराविक लाडक्या पोलिस अधिकाऱ्यांवर त्यांनी हे सगळे खाते सोपवून दिले आहे. जसे की, त्यांनी रश्मी शुक्ला नावाच्या अधिकाऱ्यांवरचे सगळे आरोप माफ करून त्यांनाच महासंचालक केले होते.

## किडलेली पोलिस यंत्रणा

या प्रकरणातला दुसरा प्रकार म्हणजे या महिलेने आत्महत्या करताना पोलिस उपनिरीक्षक बदाने याचे नाव स्पष्टपणे घेतलेले असूनही एफआयआर नोंदवताना पोलिस टाळाटाळ करीत होते. ही तक्रार नोंदवायला नातेवाईकांना सात तास लागले. त्यातही पोलिस अधीक्षकांनी असे सांगितले की, देवेंद्रांच्या आदेशानुसार आता बदानेवर कारवाई केली जाणार आहे. म्हणजे देवेंद्रांनी आदेश दिला नसता किंवा विरुध्द आदेश दिला नसता तर ही कारवाई झाली नसती असा याचा अर्थ होतो. पोलिस अधीक्षकांसारखे आयपीएस लोक कायद्यानुसार धडाक्याने कारवाई करू शकत नाहीत अशी या महाराष्ट्र राज्याची अवस्था झाली आहे. आणि, तरीही आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांना सर्वजण कार्यक्षम, नेकनामदार म्हणून गौरवत असतात. यापूर्वी बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख प्रकरणातही पोलिसांनी असेच घोळ घातले होते. तेव्हा जनतेने आंदोलने केल्यामुळे त्यांचा नाईलाज झाला. नंतर कोर्टाला काही निर्देश द्यावे लागले. अधिकाऱ्यांच्या बदल्या कराव्या लागल्या. म्हणजे हे सर्व झाले नसते तर देवेंद्र आणि त्यांच्या पोलिस खात्याने प्रकरण गुंडाळले असते की काय असा प्रश्न निर्माण होतो. त्यापूर्वी बदलापूर शाळेतील मुलींवर अत्याचाराचे प्रकरण किंवा परभणी पोलिस कोठडीतील दलित आरोपीचा मृत्यू यांमध्येही पोलिसांनी लबाड्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्याहीवेळी देवेंद्रांचा या खात्यावर वचक नाही किंवा हे त्यांच्याच अप्रत्यक्ष आशीर्वादामुळे शक्य होते आहे असा संशय व्यक्त झाला होता. आता एका तरुण व हुशार महिला डॉक्टरचा हकनाक बळी गेला आहे. पोलिस यंत्रणा आतून किती सडलेली आहे हेच या घटनांवरून दिसून येते. आता या प्रकरणाला फाटे फोडले जातील. या महिलेने आपल्या वरिष्ठांकडे तक्रार केली नव्हती असे सांगितले जात आहे. पण तिने पोलिसांना पत्र लिहिले होते हे पुरेस आहे. महिला म्हटले की नेहमी तिचे कोणाशी संबंध होते काय हे लगेच शोधले जाते व तिला बदनाम केले जाते. या प्रकरणातही तसे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोपींना कडक शिक्षा होईल असे देवेंद्रांनी सध्या तरी म्हटले आहे. पण इथे आरोपी त्यांच्याच खात्याचे लोक आहेत. या स्थितीत त्यांचे आश्वासन तडीला जाईल की नाही याबाबत साशंकता नक्कीच आहे. या स्थितीत लोकांनाच चौकशीवर लक्ष व दबाव ठेवावा लागेल. मात्र पोलिसांच्या प्रत्येक प्रकरणात आंदोलने केल्यानंतरच चौकशी पुढे जाणार असेल तर गृह खात्यात मोठी गडबड आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे इतर गोष्टींसोबतच या राज्याचे गृहमंत्रीही तातडीने बदलण्याची गरज निर्माण झाली आहे.

विचार

# चीनमध्ये गलका, ट्रम्पना दणका

***अलिकडच्या चर्चीत आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींपैकी एक म्हणजे भारताच्या वाढत्या ईव्ही उत्पादनामुळे ड्रॅगनला पोटशूळ उठला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेमध्ये सतत माकडचेष्टा करणाऱ्या ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन कंपन्या न्यायालयात गेल्याचे वृत्त आहे. अन्य एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशातील पहिले 'ग्रीन स्टील हब' गडचिरोलीमध्ये उभे रहात असून तेथिल उद्योग आणि समाजचित्र पालटत आहे.***



महेश देशपांडे

अलिकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक वेगवान आर्थिक घडामोडी अनुभवायला मिळत आहेत. त्यापैकी एक महत्वाची बातमी म्हणजे भारताच्या ईव्ही उत्पादनामुळे ड्रॅगनला पोटशूळ उठला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेमध्ये सतत माकडचेष्टा करणाऱ्या ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन कंपन्या न्यायालयात गेल्याचे वृत्त आहे. अन्य एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशातील पहिले 'ग्रीन स्टील हब' गडचिरोलीमध्ये उभे रहात असून तेथिल उद्योग आणि समाजचित्र पालटत आहे.

भारत इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) आणि बॅटरी उत्पादनात वेगाने विकास करत आहे. सरकारने या क्षेत्रात देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे भारताला जगातील सर्वात मोठ्या 'ईव्ही' बाजारपेठेत स्थान मिळवता आले आहे. तथापि, या वाढत्या यशावर चीन नाराज आहे. त्याने जागतिक व्यापार संघटनेकडे भारताविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. चीन म्हणतो, की भारताच्या अनुदान योजना जागतिक व्यापार नियमांचे उल्लंघन करतात. मुळात, चीनला भारताने या क्षेत्रात मुसंडी मारणे अपेक्षित नाही, कारण तो या वेगाने वाढणाऱ्या भारतीय औद्योगिक धोरणाला धोका मानतो. चीनच्या तक्रारीचा केंद्रबिंदू भारताची उत्पादन-लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआय) योजना आणि 'ईव्ही' धोरण आहे. ही धोरणे भारतीय कंपन्यांना अनुदाने देतात; जेणेकरून ते देशांतर्गत अधिक इलेक्ट्रिक वाहने आणि बॅटरी तयार करू शकतील. चीनचा आरोप आहे, की ही अनुदाने नियमांच्या विरुद्ध आहेत. कारण ते परदेशी कंपन्यांना स्पर्धेसाठी समान व्यासपिठ प्रदान करत नाहीत आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देऊन आयात कमी करण्याचा प्रयत्न करतात.

जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांनुसार, अशी कोणतीही तक्रार प्रथम सल्लामसलत करून सोडवली जाते. चीनने तुर्कस्तान, कॅनडा आणि युरोपीय महासंघाविरुद्धदेखील अशाच तक्रारी केल्या आहेत. तिथे हरित तंत्रज्ञानासाठीपाठिंबा वाढवला जात आहे. भारत आर्थिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करू इच्छित आहे. 'ईव्ही' आणि बॅटरी उद्योग या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. सरकारने या क्षेत्रांमध्ये देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी विशेष प्रोत्साहने दिली आहेत, जेणेकरून भारत स्वतःहून उच्च-तंत्रज्ञान उत्पादने तयार करू शकेल. ही धोरणे हळूहळू कार्यरत आहेत आणि भारत एक प्रमुख उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. चीनसाठी हे चिंतेचे कारण आहे. कारण भारताची वाढ चीनच्याच जागतिक उत्पादनशक्तीला आव्हान देत आहे.

चीन भारतावर ज्या धोरणांचा आरोप करतो, ते चीनच्या स्वतःच्या औद्योगिक धोरणांची प्रतिकृती आहे. अनेक दशकांपासून चीनने मोठ्या प्रमाणात अनुदाने, स्वस्त कर्जे आणि संरक्षणवादी धोरणांद्वारे आपल्या देशांतर्गत उद्योगांना चालना दिली आहे. या धोरणामुळे चीन हे जगातील सर्वात मोठे उत्पादन केंद्र बनले आहे. आता भारत हे मॉडेल स्वीकारत आहे. त्यामुळे चीन नाराज झाला आहे. चीनने जागतिक व्यापार संघटनेकडे औपचारिक तक्रार दाखल केली. चीनने भारतावर त्यांच्या नवीन इलेक्ट्रिक वाहन आणि बॅटरी अनुदान योजनांद्वारे देशांतर्गत उद्योगांना अन्याय्यपणे फायदा करून देत असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे चीनी कंपन्यांना नुकसान झाले आहे. भारताच्या या योजनांमुळे चीनच्या बाजारपेठेत घसरण होऊ शकते. म्हणूनच चीनने भारताच्या नवीन योजनेला विरोध केला आहे. या घडामोडींमुळे घाबरलेल्या चीनने एक निवेदन जारी करून म्हटले आहे, की भारताने ही चूक ताबडतोब दुरुस्त करावी, अन्यथा चीन आपल्या देशांतर्गत कंपन्यांचे संरक्षण करण्यासाठी कठोर पावले उचलेल. जागतिक तज्ज्ञांचे मत आहे की भारत आणि चीनमधील हा संघर्ष केवळ नवीन धोरणांबद्दल नाही. चीन भारताकडे एक मजबूत स्पर्धक म्हणून पाहत असल्याने अशा प्रकारे नोंद घेत आहे.

आता बातमी ट्रम्पतात्यांना बसलेल्या दणक्याची. नवीन एच-१बी व्हिसा अर्जदारांवर एक लाख डॉलर शुल्क लादण्याच्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाविरुद्ध 'अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स'ने खटला दाखल केला आहे. चेंबरने या निर्णयाला 'अन्याय्य' आणि कायदेशीररित्या चुकीचे म्हटले आहे. शुल्काची घोषणा एका महिन्यापूर्वी करण्यात आली होती आणि 'व्हाईट हाऊस'ने अमेरिकन कामगारांच्या जागी स्वस्त परदेशी प्रतिभा नियुक्त करणाऱ्या कंपन्यांविरुद्धचा उपाय म्हणून त्याचे वर्णन केले होते. अधिकाऱ्यांनी नंतर स्पष्ट केले, की हे शुल्क विद्यमान व्हिसा धारकांना नव्हे, तर केवळ नवीन अर्जदारांना लागू होईल. शिवाय या शुल्काच्या माफीसाठी अर्जदेखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. चेंबरने म्हटले आहे, की हे शुल्क इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन करते. ट्रम्प प्रशासनाविरुद्ध हा खटला चेंबरची पहिली कायदेशीर कारवाई आहे. हे चेंबर तीस हजारांहून अधिक व्यवसायांचे प्रतिनिधित्व करते. या खटल्यात गृह सुरक्षा विभाग आणि परराष्ट्र विभाग यांना प्रतिवादी म्हणून नामांकित केले आहे. त्यात म्हटले आहे, की अमेरिकेमध्ये गैर-नागरिकांच्या प्रवेशाचे नियमन करण्याचे व्यापक अधिकार अध्यक्षांना आहेत; परंतु हे अधिकार कायद्याने मर्यादित आहेत. काँग्रेसने संमत केलेले कायदे रद्द करता येत नाहीत. पूर्वी एच-वन बी व्हिसा अर्जाची किंमत अंदाजे तीन हजार सहाशे डॉलर होती.

चेंबरच्या मते इतक्या उच्च शुल्कामुळे कंपन्यांना कुशल कामगारांची भरती कमी करणे टाळण्यास भाग पाडले जाऊ शकते. टीकाकार म्हणतात, की 'एच-वन बी' आणि इतर कुशल कामगार व्हिसा कार्यक्रम अमेरिकन कामगारांच्या जागी स्वस्त कामगार आणतात, तर व्यावसायिक गटांचा युक्तिवाद आहे की कामगारांच्या कमतरतेला तोंड देण्यासाठी कमी किमतीचा व्हिसा आवश्यक आहे. विशेषतः अभियांत्रिकी, आयटी आणि आरोग्य विज्ञान यासारख्या क्षेत्रात अशा कामगारांची संख्या जास्त असते. एका अहवालानुसार, कंपन्या सामान्यतः 'एच-वन बी' कामगारांना त्यांच्या आकार आणि पात्रतेनुसार प्रायोजित करण्यासाठी दोन ते पाच हजार डॉलर शुल्क घेतात. 'एच-वन बी'व्हिसा कार्यक्रमामुळे दर वर्षी ८५ हजार कुशल परदेशी कामगारांना सहा वर्षांपर्यंत अमेरिकेत काम करण्याची परवानगी मिळते. या संख्येपैकी अंदाजे ७१ टक्के भारतीय नागरिक आहेत आणि तंत्रज्ञान आणि आयटी सेवा कंपन्या प्रमुख वापरकर्ते आहेत. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे अमेरिकेचे नुकसान होईल.

अलिकडेच समोर आलेले आणखी एक लक्षवेधी अर्थवृत्त म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली हे भारतातील पहिले ग्रीन स्टील हब बनवले जाईल, अशी घोषणा केली. सरकार यासाठी तीन लाख कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करत आहे. यामुळे एक लाख तरुणांना नोकऱ्या मिळतील. यापैकी ९५ टक्के नोकऱ्या स्थानिक लोकांना मिळतील. याव्यतिरिक्त, पर्यावरण वाचवण्यासाठी पाच कोटी झाडे लावली जातील. गडचिरोलीची मौलिकता जपण्याबरोबरच पाणी, जंगले आणि जमीन जपायचे आहे. विकासासाठी हे नष्ट केले जाणार नाही. गडचिरोलीला 'प्रदूषणमुक्त स्टील सिटी' बनवण्याचे उद्दिष्ट आहे. या तीन लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा थेट फायदा स्थानिक तरुणांना होईल. फडणवीस म्हणाले, की आम्ही गुंतवणूकदारांना स्पष्टपणे सांगितले आहे, की आम्ही सर्व प्रकारच्या सवलती देऊ; परंतु त्यासाठी त्यांनी किमान ९५ टक्के स्थानिक तरुणांना भरती करायला हवे. पुढील पाच ते सात वर्षांमध्ये गडचिरोली आणि चंद्रपूरमधील एक लाख तरुणांना रोजगार देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. त्याचे वर्णन त्यांनी या प्रदेशातील तरुणांसाठी 'पूर्ण परिवर्तन' करण्याचे साधन म्हणून केले. विकास आणि पर्यावरणाचे संतुलन साधण्याचे आव्हान नेहमीच महत्त्वाचे असते. सरकार यावरही उपाय शोधल्याचा दावा करते. गडचिरोलीमध्ये ५० दशलक्ष झाडे लावण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जिल्हाधिकाऱ्यांच्या थेट देखरेखीखाली राबवला जाईल. या वर्षी आतापर्यंत ४० लाख झाडे लावण्यात आली असून पुढील वर्षी हा आकडा एक कोटीपर्यंत पोहोचेल. औद्योगिकीकरणादरम्यान जिल्ह्याच्या हिरवळीला आणि परिसंस्थेला कोणताही धोका होणार नाही याची खात्री या मोहिमेद्वारे केली जाईल.

फडणवीस यांनी मनोगत व्यक्त करताना त्या काळाची आठवण करून दिली, जेव्हा गडचिरोलीमध्ये पोस्टिंग ही शिक्षा मानली जात असे. ते म्हणाले, की एक काळ असा होता, जेव्हा अधिकारी येथे पोस्टिंग करण्यास घाबरत होते. आज अधिकारी स्वतः गडचिरोलीला येऊ इच्छितात. स्टील प्लांट, हॉस्पिटल, शाळा आणि टाउनशिपसह साठ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे प्रकल्प आधीच सुरू आहेत. त्यामुळे हे संघर्षक्षेत्र संधींचे केंद्र बनत आहे. सरकार केवळ उद्योगांवरच लक्ष केंद्रित करत नाही तर शिक्षण आणि आरोग्य पायाभूत सुविधांना बळकटी देत आहे. येथे एक नवीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय बांधले जात असून गोंडवाना विद्यापीठाचा विस्तार केला जात आहे.

# वन्य प्राण्यांच्या सुरक्षेकडे दूर्लक्ष

प्रमोद जाधव

वन्य प्राण्यांच्या सुरक्षेचा गाजावाजा वन विभागामार्फत कायमच केला जातो. तरीदेखील वन्य प्राण्यांची शिकारीवर अंकूश अद्याप राहिला नाही. काल परवा वाडगाव येथे झालेल्या घटनेनंतर वन विभागाचे वन्य प्राण्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष असल्याचे उघड झाले आहे. फणसाड अभयारण्यात अनेक वन्य प्राणी आहेत. ते प्राणी संरक्षित असताना त्यांची शिकार केली जात आहे. मात्र याची खबर वनविभागाला नसणे ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. अभयारण्यात वन्य प्राण्यांची शिकार होत असताना वन विभाग झोपेत होते का असा प्रश्न आजही जनमानसातून उमटला जात आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाबरोबरच औद्योगिक जिल्हा म्हणून नावारुपाला आला आहे. जिल्ह्यात पर्यटकांबरोबरच नोकरी व्यवसायानिमित्त येणाऱ्यांची संख्याही प्रचंड वाढली आहे. पर्यटन व औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने जिल्हा महत्वाचा ठरत असताना जिल्ह्यामध्ये जंगल क्षेत्रही मोठ्या प्रमाणात आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा जिल्हयात कार्यरत आहे. रायगड जिल्ह्यातील मूरूड व रोहा तालुक्यांमध्ये असलेले फणसाड अभयारण्याचे आकर्षण कायमच पर्यटकांना राहिले आहे. फणसाड अभयारण्यात वेगवेगळ्या प्रकारची वृक्ष, प्राणी, रंगीत फुलपाखरे असून पाणथळे तसेच अभयारण्याच्या काही अंतरावर फणसाड धबधबा आहे.त्यामुळे या भागातून फिरत असताना निसर्गाचा आनंदाचा लुटण्याची संधी पर्यटकांसह स्थानिकांना कायमच मिळत आहे. फणसाड अभयारण्य हे अनेक वर्षापासून आहे. हे अभयारण्य अनेक गावांनी वेढले आहे. या अभयारण्यातील वन्य जीवांचे संरक्षण वन विभागामार्फत कायमच केले जाते. अनेकांना विनाकारण व परवानगी शिवाय या परिसरात फिरकू दिले जात नाही. त्यामुळे येथील वन्य जीवांची सुरक्षा मजबूत असल्याचे कायमच अनेकांना वाटत असते. मात्र संशयीत वन्यप्राणी मांस प्रकरणानंतर फणसाडमधील वन्य जीवांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे.

रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली मांडव्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, अलिबाग पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सरिता मुसळे, पोलीस हवालदार प्रदिप देशमुख, जितेंद्र चवरकर, पोलीस शिपाई गणेश पारधी, सागर गोळे या पथकाने गुरुवारी (दि.२३) सायंकाळी वाडगाव येथे एका घरावर छापा टाकला. घराची झाडाझडती घेतल्यानंतरकिचनमधील फ्रिजमध्ये एक किलो वजनाचे भेकर जातीच्या संरक्षीत वन्य प्राण्याचे मांस आढळून आले.तो मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील कारवाईसाठी जप्त मुद्देमाल अलिबागमधील वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे देण्यात आला असल्याची माहिती प्रसिध्दी पत्रकामार्फत दिली. त्यानंतर वन विभागाने चौकशी सुरु केली. शुक्रवारी सकाळपासून संशयीत आरोपीविरोधात चौकशी सुरु होती. अखेर दोन दिवसानंतर वन विभागाने वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार वन गुन्हा नोंदविला असल्याची माहिती दिली. उपवनसंरक्षक राहूल पाटील, सहाय्यक वनसंरक्षक भाऊसाहेब जवरे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबागचे वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील, वनपाल तुकाराम जाधव, निलेश चांदोरकर, प्रभाकर भोईर, महेश नाझरकर, जयवंत घरत, दिपक मोकल, वनरक्षक राम टाकरस पंकज घाडी, राजेंद्र पवार या पथकाने कार्यवाही करीत जप्त केलेल्या मांसाचा तुकडा सील करून तपासणी संस्थेत नमुना तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.

वन्य विभागाची ही कारवाई कौतूकास्पद असली, तरी प्रत्यक्षात शिकार करणारे आजही मोकाटपणे फिरत आहे. अनेकांकडे विनापरवाना बंदूका असल्याचे बोलले जात असताना याकडे वन विभाग अनभिज्ञ का प्रश्न उपस्थित केला जात आहे. वनसंपदाचे संरक्षण करण्याची जबाबदारी वन विभागाची असतानादेखील त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे या घटनेनंतर समोर आले आहे.

वनांमधील झाडे, वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धनासाठी वन विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. गावागावात जनजागृती घेऊन वृक्षारोपणाचे प्रबोधन केले जातात. जंगलातील प्राणी पाण्यापासून वंचित राहू नये, म्हणून वेगवेगळ्या योजनेतून पाणथळ उभारले जातात. मात्र प्रत्यक्षात आजही जिल्हयातील अनेक भागातील पाणथळे कोरडी आहेत. काही पाणथळे उभारूनही त्याठिकाणी सुविधा नसल्याचे चित्र आहे. वृक्षारोपण करून झाल्यावर वृक्षांचे संवर्धन व संगोपन होत असताना दिसून येत नाही. मागील काही वर्षापुर्वी अलिबागपासून काही अंतरावर एका मोकळ्या जागेत मुळे परिसरात वेगवेगळी रोपांचा ढीगारा पडून होता. ही बाब कृषीवलने उघड केली होती. वन विभागाचे काम चांगले असले, तरी त्यांची अंमलबजावणी योग्य होत का नाही, असा प्रश्न कायमच निर्माण होत आहे.

वनांमध्ये वणवा लागल्याच्या घटना कायमच घडत असतात. हे आटोक्यात आणण्यासाठी वन विभाग गावागावात जाऊन प्रबोधनाचे काम करतात. वणवा लागल्यावर त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी वन विभागाचे आधुनिक सामुग्री उपलब्ध आहे. परंतु वणवा रोखणे आजही कठीण आहे. जंगल टीकले तर माणूस टीकेल असे अनेक तज्ञांकडून बोलले जात आहे. त्यामुळे जंगलाच्या संवर्धनाबरोबरच तेथील वनसंपदाच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने पावले उचलली पाहिजे.

दिनविशेष

# प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल



प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांनी चित्रपटसृष्टीला एकापेक्षा एक हिट गाणी दिली आहेत. अनुराधा पौडवाल यांचा जन्म २७ ऑक्टोबर १९५२ रोजी झाला. अनुराधा पौडवाल संगीतविश्वातील एक मोठे नाव आहे. अनुराधा पौडवाल यांचे बालपण मुंबईत गेले. सुरुवातीपासूनच त्यांचा चित्रपट आणि संगीताकडे कल होता. अनुराधा पौडवाल यांनी १९७३ मध्ये आलेल्या 'अभिमान' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि जया भादुरी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटात अनुराधा पौडवाल यांनी जया बच्चन यांच्यासाठी एक श्लोक गीत गायले होते. यानंतर अनुराधा पौडवाल यांनी १९७६ मध्ये 'कालीचरण' या चित्रपटात गाणे गायले. 'आप बीती' या चित्रपटातून त्यांनी एकल गाण्यास सुरुवात केली. चित्रपटाचे संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी दिले होते. चित्रपटांमध्ये गाण्यासोबतच त्या स्टेज शोही करत असत. किशोर कुमार यांच्यासोबत त्यांनी जवळपास ३०० स्टेज शो केले. रोमँटिक गाणी असोत की भजने, सर्व प्रकारची गाणी त्यांच्या आवाजात सुमधूर वाटायची. आजही जेव्हा त्या रिॲलिटी शोमध्ये पाहुणी म्हणून येतात तेव्हा स्पर्धक हमखास त्याच्या सुपरहिट गाण्यांसाठी फरमाईश करतात. या गायिकेचे नाव आहे अनुराधा पोडवाल ज्यांची गाणी सदाबहार आहेत. अनुराधा पौडवाल या मराठी गायिका आहेत. त्यांच्या माहेरच नाव हे अलका नाडकर्णी असं आहे. यांनी मराठीसह हिंदी, तमिळ, उडिया, नेपाळी इत्यादी भाषांतील चित्रपटांतूनही पार्श्वगायन केले आहे.१९७३ सालच्या अभिमान नावाच्या हिंदी चित्रपटातील एका संस्कृत श्लोकाच्या गायनातून यांचे पार्श्वगायन क्षेत्रात पदार्पण झाले. त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या यशोदा या मराठी चित्रपटाद्वारे प्रमुख पार्श्वगायिकेच्या रूपात त्यांची कला प्रथमच श्रोत्यांसमोर आली. तेव्हापासून आतापावेतो सुमारे चार दशके चित्रपटगीते, भावगीते व भजनांच्या ध्वनिमुद्रिकांच्या माध्यमांतून या गायन करीत आहेत.अनुराधा पौडवाल या गीत गायनामधून त्यांना मिळालेल्या पैशांचा उपयोग युद्धात मरण पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबांच्या मदतीसाठी, गरिबांच्या घरांना विजेची जोडणी करून देण्यासाठी आणि कुपोषणाच्या समस्येचे अल्पतः निवारण करण्यासाठी करतात. इंग्लंडमधील इंडो-ब्रिटिश ऑल पार्टी या संसदीय गटाने इंग्लंडच्या संसदेमध्ये अनुराधा पौडवाल यांचा, त्यांच्या संगीत कारकीर्दीबद्दल आणि समाजकार्याबद्दल गौरव केला.

लोकसंसद

# यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करा !

'अतिथी देवो भव:' म्हणून ख्याती असलेल्या भारतात दरवर्षी लाखो विदेशी पर्यटक येत असतात. येथील प्राचीन भारतीय संस्कृती, येथील विविधतेतील एकता, परंपरा, पोशाख, भाषा त्यांना भुरळ घालते. पर्यटनाच्या माध्यमातून दरवर्षी देशाच्या तसेच राज्यांच्या तिजोरीमध्ये अब्जावधी रुपयांची भर पडत असते. पाहुण्यांचा आदर करण्यास शिकवणारी, अतिथींमध्ये देवाचे रूप पाहणारी आपली संस्कृती पर्यटकांवर गारुड निर्माण करते. मागील काही वर्षांपासून मात्र काही विकृत मनोवृत्तीच्या धेंडांमुळे विदेशी पर्यटकांना भारतात वाईट अनुभव येऊ लागले आहेत. याच वर्षी हम्पी येथे पर्यटनासाठी आलेल्या इस्त्रायली तरुणीसह भारतीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना घडली होती. त्यापाठोपाठ दिल्लीत एक ब्रिटिश पर्यटकावर अत्याचार झाल्याची घटना वाचनात आली होती. सिंहगडावरील घटनेने तर महाराष्ट्राचीही नाचक्की झाली होती. सिंहगडावर गिर्यारोहणासाठी आलेल्या न्यूझीलंडच्या एका तरुण पर्यटकाला काही अल्पवयीन मुलांनी मराठीतील अश्लील आणि गलिच्छ शिव्या द्यायला लावल्या. नुकतीच इंदूरमध्ये ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटर्सचा विनयभंग झाल्याची घटना घडली. आयसीसी महिला विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाच्या दोन क्रिकेटपटू हॉटेलबाहेर पडत असताना दुचाकीवरून आलेल्या अकील खान नावाच्या इसमाने त्यांचा विनयभंग केला. या घटनेची पोलिसांकडून तातडीने दखल घेण्यात आली आणि तासांतच अकील खानला अटक करण्यात आली. या सर्व घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मलिन करणाऱ्या आहेत. एक सुसंस्कृत देश म्हणून जगभरात भारताची ख्याती आहे अशा सुसंस्कृत देशाची काही नराधमांमुळे आज बदनामी होत आहे. अशा नराधमांना आयुष्यभराची अद्दल घडेल आणि भविष्यात पुन्हा कोणी असे करण्यास धजावणार नाही अशाप्रकारची कठोर शिक्षा केली जाणे अपेक्षित आहे. देशाची प्रतिमा मालिन करणाऱ्या या धेंडांवर देशद्रोहाचाही गुन्हा प्रविष्ट करण्यात यावा !

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# जयंत नारळीकर विज्ञानरत्न पुरस्काराने सन्मानित

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर प्रतिष्ठेच्या 'विज्ञानरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. केंद्र सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्काराची २०२५ नुकतीच घोषणा करण्यात आली. त्यामध्ये 'विज्ञानरत्न'सह आठ 'विज्ञानश्री', चौदा 'विज्ञान युवा' आणि एक 'विज्ञान संघ' अशा पुरस्काराचा समावेश आहे. राष्ट्रीय सर्वोच्च नागरी पद्म पुरस्कारांच्या दर्जाचे असलेले राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार हे देशातील सर्वोच्च विज्ञान पुरस्कार असून या पुरस्कारांचे हे दुसरे वर्ष आहे. २०२४ मध्ये 'विज्ञानरत्न' पुरस्काराचे पहिले मानकरी जीवरसायनशास्त्रज्ञ प्रा. गोविंदराजन पद्मनाभन हे होते. महाराष्ट्रातील अनिरुद्ध भालचंद्र पंडित (अभियांत्रिकी विज्ञान) यांना 'विज्ञानश्री' तर सुरहुद श्रीकांत मोरे (भौतिकशास्त्र) आणि दीपा आगाशे (जीवशास्त्र) यांना 'विज्ञान युवा' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पद्मभूषण (१९६५), पद्मविभूषण (२००४) कलिंग पुरस्कार (१९९६), शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (१९७८) अशा अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आलेल्या जयंत नारळीकर यांना मरणोत्तर प्रतिष्ठेचा 'विज्ञानरत्न' पुरस्कार जाहीर झाल्याने विज्ञान क्षेत्रात समाधान आणि आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

**–प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ ऑक्टोबर

१) श्रीम. हौलुबाई लक्ष्मण करंजेकर
२७-१०-१९५०
वरसोली-अलिबाग, रायगड.

## चालत्या ट्रकला भीषण आग

**खानिवडे:** वसई परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जिथे रस्त्यावरून जात असलेल्या एका अवजड 'आयवा' ट्रकला भीषण आग लागून ते वाहन पूर्णपणे जळून खाक झाले. मिळालेल्या माहितीनुसार, अवजड वाहतूक करणारा एक 'आयवा' ट्रक अंबाडीच्या दिशेने जात असताना शिरवली येथील पूर्णांक पाडाजवळ पोहोचला. त्यावेळी गाडीतून अचानक धूर येऊ लागला. चालकाच्या ही गोष्ट लक्षात येताच, त्याने प्रसंगावधान राखत त्वरित ट्रक रस्त्याच्या बाजूला थांबवला. मात्र, तोपर्यंत ट्रकने पेट घेतला होता आणि काही क्षणातच तो आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

# जलवाहतुकीमुळे कोकणचे पर्यटन वाढणार

### ।। व्यावसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण ।। नयनरम्य सौंदर्य जवळून अनुभवता येणार



**। गुहागर । प्रतिनिधी ।**

बाल्टिक समुद्रावरून अत्याधुनिक बोटी लवकरच जलवाहतुकीसाठी आणण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. त्यातच आता गुहागरनजीकच्या दाभोळ बंदरात हाऊसबोट सुरू झाली आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यासह संपूर्ण कोकणचे जलपर्यटन वाढणार असून पर्यटनाच्या दृष्टीने गुहागरचे महत्त्व अधिक वाढणार असून पर्यटकांवर अवलंबून असलेल्या येथील उद्योग, व्यावसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोकणाच्या जल पर्यटनाला एक नवा आयाम देत दापोलीचे माजी आ. डॉ. चंद्रकांत मोकल यांची भव्य हाऊसबोट दाभोळ खाडीमध्ये दाखल झाली आहे. विशेष म्हणजे या हाऊसबोटमध्ये ८ खोल्या आहेत. इतक्या मोठ्या संख्येने खोल्या असलेली ही महाराष्ट्रातील पहिली हाऊसबोट असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कोकणच्या जलपर्यटनाला एक आलिशान अनुभव मिळणार आहे. कोकणातील खाड्या बोटीच्या माध्यमातून जोडून डॉ. मोकल यांनी यापूर्वीच कोकणच्या पर्यटन क्षेत्रात वेगळी क्रांती केली आहे. आता सुवर्णदुर्ग शिपिंगच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी अत्याधुनिक हाऊसबोटमुळे पर्यटकांना दाभोळ खाडीचं शांत आणि नयनरम्य सौंदर्य, जैवविविधता, कांदळवन जवळून अनुभवता येणार आहे. तसेच कोकणी खाद्य पदार्थांची चवही चाखता येणार आहे. साहजिकच केवळ जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण कोकणात जलपर्यटन वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दाभोळ हे दापोली तालुक्याचे किनारपट्टी भागातील शेवटचे टोक आहे. मात्र, सर्वाधिक या खाडीचा परिसर गुहागरला लागून आहे. दाभोळला उपसागर असेही म्हणतात. दाभोळ हे ऐतिहासिक बंदर असून खाडीच्या मुखाजवळ आहे. या खाडीच्या किनार्यावर किल्ले, ऐतिहासिक बंदरे, ऐतिहासिक मंदिरे, ऐतिहासिक गुहा, गरम पाण्याचे झरे, जहाज बांधणी आणि जहाज दुरुस्ती कारखाने, नैसर्गिक संसाधने, पर्यटन, दाभोळ पॉवर कंपनी, कोकण एलएनजी, वीज निर्मिती आणि वायू प्रकल्प, यांत्रिक आणि अयांत्रिक मासेमारी, मुंबई ते कोकण रो-रो सेवेसाठी जेट्टी आणि भविष्यातील सागरी महामार्ग व खाडीवर पूल होण्याची शक्यता आहे, या सर्व गोष्टींमुळे दाभोळखाडीला अनन्य साधारण महत्त्व आहे.

सुमारे ५० वर्षांपूर्वी मुंबईतून गोवा प्रवासी जलवाहतूक सुरू होती. त्यावेळी उतरण्याचे दाभोळ हा सागरी थांबा होता. काही काळाने ही जलवाहतूक बंद झाली. मात्र, दाभोळचे महत्त्व कधीही कमी झाले नाही. अगदी एन्रॉन प्रकल्पापासून ते आजपर्यंतच्या बहुचर्चित आरजीपीपीएल प्रकल्पामुळे दाभोळ हे देशभरात नावलौकिक प्राप्त झालेले बंदर आहे. अशा दाभोळ खाडीत आता जलवाहतूक सुविधा सुरू झाली आहे.

> **सागरी मार्गातून बोटीने प्रवास**
>
> *आता मुंबई ते गोवा अशी जलवाहतूक कायम सुरु झाल्यास दाभोळचे महत्त्व वाढणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक पर्यटक दापोली, गुहागर, गणपतीपुळे येथे पर्यटनासाठी येतात. जलवाहतुकीमुळे पर्यटकांना एकाचवेळी या सागरी मार्गातून बोटीने प्रवास करता येणार आहे.*

## रिक्षांवर वाहतूक पोलिसांची कारवाई

**मिरा रोड :** काशीमीरा परीसरातील डाचकूल पाडा येथे दोन गटात वाद झाला होता. यामध्ये कन्नोज रिक्षाचालकांच्या टोळीने तलवार व काठ्यासह हल्ला केला होता. या हल्ल्याप्रकरणी ५५ ते ६० लोकांवर गुन्हा दाखल झाल्या नंतर वाहतूक पोलिस हे बेकायदा रिक्षा चालकांना संरक्षण देत असल्याचे आरोप झाले. या घटनेनंतर वाहतूक पोलिसांनी ठिकठिकाणी तपासणी करून ६५९ रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे.

## सर्वांसाठी एकच स्मशानभूमी आवश्यक

**। सावंतवाडी । प्रतिनिधी ।**

स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता नसल्यामुळे मृतदेहाला स्मशानभूमीत नेण्यासाठी दोन तास तिष्ठत राहावे लागल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. त्यामुळे सामाजिक समानता आणि समरसता प्रस्थापित करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात हिंदू धर्मातील सर्व जातींसाठी आवश्यक सुविधांनीयुक्त असलेली एकच सामुदायिक स्मशानभूमी असावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. नकुल पार्सेकर यांनी पालकमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे आहे.निवेदनात म्हटले आहे की, सामान्यतः सर्व हिंदू समाजासाठी एकच स्मशानभूमी असावी, असा कोणताही व्यापक शासन निर्णय नसला तरी, जातीय भेदभाव टाळण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेली सामाजिक समानता प्रस्थापित करण्यासाठी अनेक ठिकाणी राज्य सरकार आणि उच्च न्यायालयाने सामाईक दहनभूमी तयार करण्याचे किंवा अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमींना सामाईक सुविधा म्हणून वापरण्याचे आदेश दिले आहेत. हा निर्णय सामाजिक समरसतेसाठीही ऐतिहासिक ठरेल, असे अ‍ॅड. पार्सेकर यांनी म्हटले आहे.

# पावसाने भातशेती झोपवली

**। खानिवडे । प्रतिनिधी ।**

वादळी वाऱ्यासह बरसलेल्या पावसाने पिवळ्या सोन्यासारखी भाताच्या कणसांनी बहरलेली उभी भातशेती शेतातील चिखलात झोपवली. यंदा वर्षातील पाच महिन्यांहून अधिक बरसात करणाऱ्या पावसामुळे आधीच हलवार पिकांचे नुकसान झेलणाऱ्या शेतकऱ्यांना वारंवार येणाऱ्या आस्मानी संकटामुळे चिंतेने ग्रासले आहे. वसईच्या पूर्व व पश्चिम भागात तालुक्याचे खरिपातील मुख्य पीक असलेल्या भात शेतीची लागवड करण्यात आली होती. यामध्ये कमी दिवसांचे हलवार पीक हंगामातील आपल्या वेळेत पूर्णपणे पिकून काढणीला आला होता. मात्र लांबलेल्या पावसाने या हलवार पिकांची नासधूस केली. तर निम गरवार व गरवार पिकांच्या भाताची कणसे चांगल्याप्रकारे कापणीसाठी तयार झाली होती. त्यात मागील काही दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे आणि हवामानाचा कोणताही अंदाज न मिळाल्यामुळे काहींनी कापणीसाठीही सुरवात केली होती. मात्र दिवाळीत लक्ष्मी पूजनाच्या दिवशी वसईच्या काही भागात पावसाने वाऱ्यासह जोरदार हजेरी लावली . वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने कापणीसाठी तयार झालेली भात शेती आडवी झाली. तर कापणी केल्यानंतर शेतात सुकविण्यासाठी पसरलेली भात पिके भिजून गेल्याने नुकसान झाले आहे. यंदा पावसाचे सावट काही केल्या कमी होण्याचे नाव घेत नाही अधूनमधून अवकाळी पाऊस सुरूच आहे. त्याचा मोठा परिणाम भात शेतीवर होऊ लागला आहे. जर पावसाचे सत्र असेच सुरू राहिले तर जे काही उत्पादन निघाले आहे ते सुद्धा वाया जाईल असे शेतकऱ्यानी सांगितले आहे.

## आपला दवाखाना पडला ओस

### परिचारिकांचा पगार रखडला

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे शहरात ४० ठिकाणी सुरू करण्यात आलेला आपला दवाखाना उपक्रम बंद पडला असून कंत्राटदार कंपनीने येथे काम करणाऱ्या परिचारिकांचे पगार थकवल्याने त्यांनी आमदार संजय केळकर यांच्याकडे न्यायाची मागणी केली.

हे दवाखाने बंद पडल्याने त्याचा ताबा इतर व्यवसायांनी घेतल्याची देखील चर्चा आहे. शहरात ४० ठिकाणी सुरू असलेल्या या दवाखान्यांमध्ये काम करणारे कर्मचारी आणि परिचारिका बेरोजगार झाले असून त्यांचा सहा सहा महिन्यांचा पगार देखील थकला आहे. हा पगार मिळवून देण्याची मागणी या कर्मचाऱ्यांनी जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात आमदार संजय केळकर यांच्याकडे निवेदन देऊन केली.

याबाबत बोलताना केळकर यांनी सांगितले की आपला दवाखाना हा उपक्रम राबवण्यासाठी ठाणे महापालिकेने बंगळुरु येथील मेडको नावाच्या कंपनीला कंत्राट दिले होते.

ऑक्टोबरपर्यंत या कंपनीकडे कंत्राट होते, मात्र ऑगस्टमध्येच हे दवाखाने बंद पडले.

तत्पूर्वी मागील सहा सहा महिन्यांचा पगार देखील कंपनीने कर्मचाऱ्यांना दिलेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील कोरडी गेली. या कंपनीला ५६ लाखांचा दंड ठोठावण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे असले तरी ही कंपनी महापालिकेला दाद देत नाही. त्यामुळे महापालिकेने कंपनीकडून सर्व दंड वसूल करून कर्मचाऱ्यांचे रखडलेले पगार द्यावेत आणि संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी केळकर यांनी केली. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अन्यथा या कर्मचाऱ्यांचा महापालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही केळकर यांनी दिला.

बंद पडलेल्या दवाखान्यांच्या जागी आता अनेक ठिकाणी इतर व्यवसाय सुरू झाल्याचे दिसत असून एके ठिकाणी तर साड्यांचे दुकान सुरू झाले आहे. त्यामुळे या जागा देखील गिळंकृत होण्याची भीती नागरिकांकून व्यक्त करण्यात यात आहे.

# कलावंतांच्या पंढरीत नाट्यगृहाची वानवा

### शहापुरात सांस्कृतिक भवन, करमणूकगृह नाही



**। डोळखांब । प्रतिनिधी ।**

एकीकडे २५ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय कलावंत दिन साजरा होत असताना, शहापूर या कलावंताच्या पंढरीत आजही नाट्यगृह नसल्याने येथील विविध क्षेत्रातील कलाकारांची परवड होत आहे. शहापूर हा खरे पाहाता दुर्गम, डोंगराळ, तसेच विविध पारंपरिक लोककलावंताचा तालुका मानला जातो.

गेली तीन दशके येथे भारूड, रामलीला, बोहाडे, तसेच फिरते तमाशे यासारख्या पारंपरिक लोककला मोठ्या आवडीने जोपासल्या जायच्या. त्याकाळात या कलावंताना मोठी मागणी ही होती; परंतु कला जोपासण्यासाठी हक्काचे व्यासपीठ नव्हते, तर इमारत ही नव्हती आजही या परिस्थितीत बदल झालेला नाही.

तालुक्यातील डोळखांब परिसरातील भिनार गावात संयुक्त महाराष्ट्राचे चळवळीत हिरीरीने भाग घेणारे तसेच शाहीर अमर शेख, सिनेकलावंत दादा कोंडके यांचा सहवास लाभलेले शंकरराव कुलकर्णी राहात होते. तर गानकोकिळा लता दिदी मंगेशकर यांचा सहवास लाभलेले मनोहर कदम शहापुरात राहात होते.

पांढरे यांच्या सह्याद्री कलासंघ या नाट्य संस्थेतील सुभाष शिंदे, महेश फाळके, दीपक सरोदे या कलाकारांनी अनेक मालिकांमध्ये तसेच सिनेमांमध्ये अभिनय करून नावलौकिक मिळवला आहे. दाताचं दातवण घ्या गं कुणी, कुंकू घ्या, कुणी काळं मणी, या गिताचे कवी प्रकाश पवार हे देखील शहापूर तालुक्यातील कसारा गावचे सुपुत्र या कलाकारांनंतर सद्या नवोदित बासरी वादक, ढोलकीवादक, नाट्य कलवंत, हार्मोनियम वादक, कीर्तनकार, मंगलाष्टके गायक सुमेध जाधव यांसारखे संगीतकार शहापुरात उदयास आले आहेत. या कलाकार मंडळीत दिवसेंदिवस भर पडत असून अनेक कलाकारांनी संघटना निर्माण करून तालुक्यात चांगले काम सुरू केले आहे. परंतु कलाकारांच्या या भाऊगर्दीत याच कलाकारांना प्रोत्साहन मिळावे किंवा तालुक्यात विविध स्वरूपाचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी हक्काचे नाट्यगृह किंवा सांस्कृतिक भवन, करमणूक गृह नाही.

# ट्रॉलर घुसखोरीवर ड्रोनद्वारे नियंत्रण

**। पालघर । प्रतिनिधी ।**

समुद्रात ट्रॉलर, पर्ससीन व एलईडी पद्धतीची मासेमारी पारंपारिक मासेमारीला मारक ठरत असून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी समुद्रात ड्रोनद्वारे टेहळणी करण्यात येत असल्याने ट्रॉलर, पर्ससीन, एलईडी पद्धतीच्या मासेमारीला काहीसा आळा बसला आहे. पालघर जिल्ह्यात सागरी क्षेत्रात अवैद्य पद्धतीने मासेमारी होणार नाही यासाठी तीन ठिकाणी नियमितपणे १२ समुद्रात मैलापर्यंत ड्रोनद्वारे टेहळणी केली जाते. सागरी सुरक्षेसाठी ड्रोनद्वारे समुद्रात टेहळणी करण्यास ९ जानेवारी २०२५ पासून पालघर जिल्ह्यात प्रारंभ झाला. पालघर जिल्ह्यातील झाई, शिरगांव व रानगाव येथून ड्रोन ऑपरेशन होते. प्रत्येक ठिकाणी कार्यरत असणारे हे टेहळणी ड्रोन १२० मीटर उंचीवरून २५ किमीचा परीघ पूर्ण करतो. किनाऱ्यापासून १२ सागरी मैल अंतरावर टेहळणी करणाऱ्या ड्रोनची बॅटरी दोन तास चालते. या ड्रोनचे सर्वसाधारणपणे दिवसातून तीन वेळा उड्डाण केले जातात. ड्रोनवरील छायाचित्र हे मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालयात असलेल्या नियंत्रण कक्षामध्ये ऑनलाइन पद्धतीने दिसून येते.

या टेहळणी दरम्यान काही संशयास्पद दिसल्यास नियंत्रण कक्ष संबंधित जिल्ह्यांच्या सहआयुक्त कार्यालयांना सूचना देण्याचे काम करत असून गस्ती नौकेद्वारे संबंधित ठिकाणी पोहोचून आवश्यकती कारवाई करण्यात येते. याशिवाय नवमित्र या मोबाईल प्लिकेशनद्वारे मत्स्य व्यवसाय विभागाच्या कर्मचाऱ्यांना देखील ड्रोन टेहळणीचा तपशील उपलब्ध असतो. पालघर जिल्ह्यात सागरी क्षेत्रात करण्यात येणाऱ्या या ड्रोन टेहळणीद्वारे नौकांचा कलर कोड, मासेमारी प्रकार, निषिद्ध क्षेत्रात एलईडी, ट्रॉलर किंवा परसीन मासेमारी, समुद्रात काही संशयास्पद हालचाली घडल्या तर वाहून गेलेला कंटेनर इत्यादी शोधण्यास मदत होते.

### रेल्वे प्रशासनाकडून मागण्यांची पूर्तता | ६ तास ४५ मिनिटात स्थानकावर पोहोचतील

# दिवा-चिपळूण मेमू लोकल सुरु

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वे प्रशासनातर्फे दिवा रेल्वे स्थानक ते चिपळूण रेल्वे स्थानकापर्यंत मेमू लोकल रेल्वे सेवा प्रवाशांसाठी कायमस्वरूपी सुरू करण्यात आली असून मेमू लोकलच्या वेळापत्रकात काहीसे बदल करण्यात आले आहेत.

भरपूर वर्षांपासून कोकण रेल्वे प्रवासी संघटना आणि माणगाव, गोरेगाव, वीर आणि चिपळूणमधील प्रवाशांची दिवा ते चिपळूण लोकल सेवा करण्याची मागणी होती. परंतु बऱ्याच वेळा मध्य रेल्वे प्रशासनाकडून दिवा ते चिपळूण लोकलच्या मागणीला दुर्लक्षित करण्यात आले होते. मात्र २० ऑगस्टपासून गणेशोत्सवाच्या हंगामी काळामध्ये दिवा ते चिपळूण मेमू लोकल सेवा तात्पुरता सुरू करण्यात आली आहे. दरम्यान दिवा ते चिपळूण आणि चिपळूण ते दिवा रेल्वे स्थानकांसाठी दोन मेमू लोकल उपलब्ध केल्या आहेत.

कालांतराने मध्य रेल्वे प्रशासनातर्फे दिवा ते चिपळूण मेमू लोकल सेवेला थांबा देण्यात आला. परंतु काही स्थानिकांच्या आणि कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव आणि वीर रेल्वे स्थानकातून नियमित पनवेल, दिवा स्थानकासाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मागण्यांची रेल्वे प्रशासनाकडून पूर्तता करत १५ ऑगस्टपासून दिवा ते चिपळूण मेमू लोकल सेवा कायम करण्याचे मध्य रेल्वे प्रशासनातर्फे जाहीर करण्यात आले.

मेमू लोकलच्या वेळापत्रकात देखील काहीसे बदल घडवण्यात आले. एक मेमू लोकल दिवा रेल्वे स्थानकातून सकाळी ७.१५ वाजता चिपळूण रेल्वे स्थानकासाठी रवाना होईल तसेच दुसरी मेमू लोकल चिपळूण रेल्वे स्थानकातून दुपारी १२.०० वाजता दिवा रेल्वे स्थानकासाठी धाव घेईल.



दिवा ते चिपळूण मेमू लोकल सेवेमुळे या रेल्वे मार्गावरून प्रवाशी अवघ्या ६ तास ४५ मिनिटात निश्चित स्थानकावर पोहोचतील, असे देखील दिवा रेल्वे प्रवासी संघटनेने जाहीर केले आहे.

> **२६ रेल्वे स्थानकावर थांबा**
>
> *दिवा ते चिपळूण मेमू लोकल पश्चिम कोस्टल रेल्वे मार्गावरील तब्बल २६ रेल्वे स्थानकावर थांबेल. तसेच त्यांपैकी पनवेल, पेण, रोहा, माणगाव या ४ मुख्य जंक्शनवर क्रॉसिंगसाठी थांबा घेण्याचे दिवा रेल्वे प्रवासी संघटनेतर्फे सांगण्यात आले आहे.*

## निवडक

### पावसामुळे भातपीक आडवे

**रत्नागिरी :** बांदा व परिसरातील शेतकऱ्यांवर अवकाळी पावसाचे मोठे संकट कोसळले आहे. अनेक ठिकाणी उभे पीक आडवे पडून जमिनीवरच कुजण्याच्या अवस्थेत आले आहे, तर काही ठिकाणी कोंब फुटल्याने धान्य निरुपयोगी ठरत आहे. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अवकाळी पावसाने सावंतवाडी तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. पाडलोस, न्हावेली, मडुरा, कास, निगुडे, सोनुर्ली, सातोसे, शेर्ले, दांडेली, बांदा, वाफोली, विलवडे आणि इन्सुली या गावांमध्ये गेल्या सहा दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान केले आहे. खत, बियाणे, मजुरी यांवर हजारो रुपये खर्च करून उभे केलेले पीक अवकाळी पावसामुळे पूर्णपणे उध्दवस्त झाले आहे. काही ठिकाणी कापणी करून ठेवलेले पीक पावसाने भिजून कुजत असून, ते विकण्यायोग्य राहिलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील आशेचा किरण आता अवकाळी पावसात बुडाल्याचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

### हर्णे बंदरात म्हाकळाची आवक



**दापोली :** दापोली तालुक्यातील प्रसिद्ध हर्णे बंदरात सध्या म्हाकुळ मासळीचा हंगाम ऐन भरात आला आहे. बंदरावर मच्छीमार नौकांची गर्दी, लिलावासाठी सुरु असलेला गोंगाट तसेच मासळीच्या वासाने दरवळलेले वातावरण असे चित्र सध्या हर्णे बंदरावर पाहायला मिळत आहे. मुबलक प्रमाणात मिळणाऱ्या म्हाकळामुळे मच्छीमारांमध्ये उत्साह आहे. बंदरात मुंबलक प्रमाणात मिळालेल्या म्हाकुळ प्रकारातील मासळीला स्थानिक पातळीवर किलोला ३०० ते ३५० रुपये किलो असा दर मिळत असून, लिलावाची रंगत वाढत आहे. म्हाकुळ ही हिवाळ्यात मिळणारी चवदार समुद्री मासळी म्हणून प्रसिद्ध आहे. साधारणपणे ऑक्टोबरपासून जानेवारीपर्यंत या मासळीची आवक मोठ्या प्रमाणात होते. तिचे मांस मऊ, रसाळ आणि पौष्टिक असल्याने घराघरात तसेच हॉटेलांमध्येही ती खवय्यांमध्ये पहिली पसंती ठरत आहे. दापोली तालुक्यातील हर्णे बंदरावर दररोज लिलावाची लगबग सुरू असते. म्हाकळासह सुरमई, बांगडा, कोळंबी, पापलेट आदी मासळीही उपलब्ध होते. मात्र, सध्या म्हाकळानेच बाजारपेठ गाजवली आहे.

### वेंगुर्ला तालुक्यात पावसाचा हाहाकार



**वेंगुर्ला :** तालुक्यात विजेच्या गडगडाटासह झालेल्या मुसळधार पावसाने सर्वत्र हाहाकार माजवला. ऐन कापणीच्या वेळी आलेल्या या अवकाळी पावसाने भातशेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी भाताची पेंडके भिजल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असला तरी, नुकत्याच सुरू झालेल्या भातकापणीच्या कामात खंड पडला आहे. पिकलेल्या भातशेतीला फटकाजोरदार पावसामुळे शेतजमिनीत पाणी साचले, परिणामी भातशेतीसाठी तयार केलेल्या भाताच्या उडव्या आणि खळे पाण्याने भरून गेले. भाताची पेंडके भिजल्याने शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी तर भातशेती पूर्णपणे करपून गेली आहे. कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून गरीब शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरू लागली आहे.

### वाढलेल्या झुडपांमुळे प्रवाशांची गैरसोय

**चिपळूण :** कोकण रेल्वेचे चिपळूणमधील स्टेशन जरी वालोपे येथे असले तरी बहुसंख्य प्रवाशी चिपळूणच्या बाजूचे असल्यामुळे मुंबईला जाणारे किंवा चिपळूणला येणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी चिपळूण बाजूने असते. यापैकी काही प्रवासी गांधारेश्वर पुलामार्फत चिपळूणकडे जातात तर काही पेठमाप, साईनाका मार्गाने प्रवास करतात. मात्र, या रस्त्यावर मोठी झाडीझुडपे वाढल्यामुळे प्रवास करणे अडचणीचा वाटू लागले आहे. रेल्वेस्टेशनच्या चिपळूणकडील दिशेतील उजव्या बाजूने पेठमापकडे जाणारा रस्ता फार अरुंद आहे. या मार्गाने शहराकडे जाणाऱ्या प्रवाशाबरोबरच मिरजोळी, कोंढे, शिरळ या ग्रामीण भागातील लोकदेखील याच मार्गाने जातात. आता या रस्त्याच्या कडेला इतकी झुडपे वाढली आहेत कि ती रस्त्यावर आलीत यामुळे दुचाकी, रिक्षा व चारचाकी गाड्या समोरासमोर आल्या कि पासिंग करताना अडचण येते तर दुचाकीसाठी हे धोकादायक आहे., शिवाय याच मार्गावर दोन ठिकाणी धोकादायक वळणे आहेत, त्यामुळे समोरून येणारे वाहन नजरेस पडत नाही. कोकण रेल्वेमार्गावरील चिपळूण हे महत्वाचे रेल्वेस्टेशन आहे. तसेच लवकरच हे स्टेशन जंक्शन होणार आहे. अशावेळी अशा गजबजलेल्या, गर्दीचे ठिकाण असलेल्या स्टेशन रेल्वेकडील रस्ता अरुंद का? असा प्रश्न प्रवाशांकडून विचारण्यात येत आहे. रेल्वे प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी लोकांच्या मागणीचा विचार करुन सदर रस्ता रुंदीकरण व काँक्रिटीकरण करावे, यासाठी जोरदार मागणी होत आहे. तसेच रस्त्यावर आलेली झाडीझुडपे लवकर हटवावीत असे मागणी केली आहे.

### चिमुकल्यांनी साकारले गड-किल्ले

**कुडाळ :** पिंगुळी शेटकरवाडी येथील किल्ले गड बनविण्याच्या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिमुकल्या बालकलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे महाराष्ट्र राज्यातील बनविलेले गड-किल्ले लक्षवेधी ठरले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेत १७ जणांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. श्री देव महापुरुष वाचनालय व ग्रंथालय शेटकरवाडी पिंगुळी यांच्या वतीने यावर्षी प्रथमच दिवाळी सणानिमित्त राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे सिंधुदुर्गसह महाराष्ट्र राज्यातील गड व किल्ले यांचे जतन व संवर्धन व्हावे, गड-किल्ल्यांची प्रत्येकामध्ये आठवण-साठवण राहावी, या अनुषंगाने गड-किल्ला बनविणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण कलाशिक्षक संदीप साळस्कर, सुभाष लाड, अशोक सर्वेकर, अर्जुन राणे, अजय सावंत यांनी केले. रचनात्मक मांडणी, रंगसंगती आणि एकूणच सादरीकरण या अनुषंगाने या सर्व बालचिमुकल्या कलावंतांनी आपल्या कल्पक बुद्धीतून लक्षवेधी किल्ले व गड साकारले. यामध्ये मल्हार गड, राजगड, दुर्गदुर्गेश्वर, रायगड, प्रतापगड, तोरणा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग किल्ला आदी एकाहून एक सरस किल्ले गड साकारले होते. सकाळी या स्पर्धेचे परीक्षण करण्यात आले.

## निवडक



### तळा तालुक्यात पावसाची रिमझिम

**तळा :** तालुक्यात ऐन दिवाळीत पावसाने हजेरी लावली आहे. दुपारच्या सुमारास पडत असलेल्या रिमझिम पावसामुळे शेतकऱ्यांसह व्यापारी वर्गात देखील चिंतेचे वातावरण पसरले आहे. यावर्षी लांबलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी उशिरा भात कापणीला सुरुवात केली. त्यामुळे अद्यापही बऱ्याचशा शेतकऱ्यांची भात कापणी बाकी आहे. गेले चार दिवस दुपारनंतर अचानक ढगाळ वातावरण करत पाऊस रिमझिम बरसत असल्याने ज्या शेतकऱ्यांची अद्याप भात कापणी बाकी आहे, अशा शेतकऱ्यांची एकच तारांबळ उडाली आहे. यासह दिवाळीचा सण सुरू असल्यामुळे विविध प्रकारच्या दिवाळीच्या साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. मात्र, अचानक येत असलेल्या पावसामुळे व्यापाऱ्यांची देखील धावपळ उडाली आहे. पावसामुळे नागरिकांची देखील एकच तारांबळ उडाली असून खरेदी करण्यापेक्षा त्यांनी आपल्या घरी जाणे पसंत केले आहे. त्यामुळे दुपारनंतर बाजारपेठेतील व्यवसायावर परिणाम होऊन ऐन दिवाळीच्या सणात बाजारपेठेत मंदी असल्याचे चित्र भासत आहे.



### किल्ले स्पर्धेला जोरदार प्रतिसाद

**उरण :** तालुक्यातील सारडे विकास मंच आणि कोमनादेवी ऑक्सिजन पार्कतर्फे मुलांना गडकिल्लयांचे महत्व आणि माहिती प्राप्त व्हावी, यासाठी दरवर्षी किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील मोठ्या उत्साहात स्पर्धा संपन्न झाली. यावेळी स्वराज्याचे तोरण ज्यांनी बांधले त्या छत्रपती शिवरायांच्या, ज्यांनी या स्वराज्य रक्षकाला जन्म दिला त्या जिजाऊंच्या आणि जे मुघलांपुढे अखेरच्या श्वासापर्यंत झुकले नाहीत त्या छत्रपती संभाजी राजांच्या स्मृतीस उजाळा देण्यात आला. या स्पर्धेत ५५ स्पर्धकांनी सहभाग दर्शविला होता. यावर्षी या स्पर्धेचा प्रथम मानकरी राज घरत हा ठरला आहे. त्याने कोंढाणा किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती. तर, द्वितीय मानकरी श्रीवेद म्हात्रे हा ठरला असून त्याने सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती. तसेच, उत्तेजनार्थ स्वरूप पाटील हा ठरला असून त्याने अजिंक्य तारा किल्ल्याची प्रतिकृती तयार केली होती. विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, इतर स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वच स्पर्धकाना रोहित पाटील याच्या तर्फे भेट वस्तू देण्यात आल्या. या स्पर्धेदरम्यान प्रशांत म्हात्रे यांनी शिवरांयाचे गडकिल्लयांबद्दल महत्वाची माहिती दिली.



### दिपाली पाटील पुरस्काराने सन्मानित

**पाताळगंगा :** ग्रुप ग्रामपंचायत माजगांव सरपंचपदावर कार्यरत असलेल्या दिपाली पाटील यांचे गावाच्या विकासात फार मोठे योगदान असून त्यांच्या माध्यमातून विविध समस्या मार्गी लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्यांचा नुकताच लोणावळा येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानिकत करण्यात आले. आखिल भारतीय सरपंच परिषद आणि जयंत पाटील मित्र मंडळ कुर्डू यांच्या माध्यमातून लोणावळा येथे ग्रामीण भागातील कार्यरत असलेल्या सरपंचांनी केलेल्या कामांची दखल घेण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक सरपंचांनी गावच्या विकासाठी प्रयत्नशिल असावे, या उद्दांत विचारांतून हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. यावेळी दिपाली ठाकूर यांना उप सरपंच अपर्णा शिंदे, ग्रामसेवक संदिप धारणे तसेच सदस्य नरेश पाटील यांनी पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबाग, रोहा रोड येथे मालाडेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबाग, चौल येथे ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी मुलींची आवश्यकता आहे. ज्यूस मेकिंग, रेस्टॉरंट सर्व्हिस, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- अलिबागमध्ये दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ७९७२९३३३७०, ९८२२४६१७६१
- For share market bolt operations fresh or experienced, graduate or post graduate candidates required for office in Alibag.For interview Contact- 9923750549

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# नागोठणे आंगर आळीत पाणीच पाणी

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे परिसरात शुक्रवारी (दि.२५) सायंकाळी तुफानी पाऊस पडला. नागोठण्याच्या पूर्वेकडील डोंगरातून आलेले हे पावसाचे पाणी नागोठण्यातील आंगर आळी भागात मोठ्या प्रमाणात घुसले. त्यामुळे येथील नागरिकांचा एकच गोंधळ उडाला आणि या पाण्यामुळे नागरिकांचे नुकसानही झाले. मुंबई-गोवा महामार्गावर आंगर आळी लगत नुकताच सुरू करण्यात आलेल्या पुलाच्या कामात नियोजनाचा अभाव असल्यामुळे नैसर्गिक पाण्याचा प्रवाहाला अडथळा निर्माण होऊन या ठिकाणी पाणीच पाणी झाल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

काही दिवसांपासून जिल्ह्यात तुफानी पाऊस पडत आहे. यादरम्यान, नागोठण्यातील आंगर आळीत मोठ्याप्रमाण पाणी आले होते. हे आलेले पाणी सुमारे दीड ते दोन फूट होते. डोंगरातून आलेले हे पाणी आंगर आळीतून वाहत जाऊन डॉ. कुंटे यांच्या दवाखान्यापासून श्री जोगेश्वरी माता मंदिर मार्गे नागोठणे पोस्ट ऑफिस पर्यंत आले होते. या पाण्याला मोठा वेग असल्याने आणि त्यातच नागोठण्यातील वीज वितरणाच्या अवकृपेने नेहमीप्रमाणे नागोठण्यातील वीजही गुल झाली होती. तसेच, नागरिकांच्या घरातील अन्न-धान्याचे नुकसान झाले आहे. दरम्यान, ज्या नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे त्यांना तात्काळ मदत मळिावी, अशी मागणी आंगर आळी ग्रामस्थांच्यावतीने ग्रामपंचायत सदस्या भाविक गिजे व सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे यांच्याकडे करण्यात आली आहे.




### सचिन कुलकर्णी यांची कार्यतत्परता

डोंगरातील पाण्याचा प्रवाह नागोठण्यातील आंगर आळी भागात घुसल्याचे समजताच नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी हे त्वरीत महामार्गावरील पुलाच्या ठिकाणी पोचले. त्यांनी त्वरित यंत्रणा कार्यान्वित केल्याने त्या ठिकाणी आलेल्या जेसीबी यंत्राच्या साहाय्याने पाण्याच्या प्रवाहाचा मार्ग बंद करून हे पाणी दुसऱ्या मार्गे फिरवल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला. यावेळी आंगर आळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> जोपर्यंत पुलाचे व त्याखालील मोरींचे काम रीतसर व योग्य पद्धतीने करून पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला आवश्यक ती जागा निर्माण करीत नाही, तोपर्यंत पाण्याचा जुना मार्ग मोकळा करू नये. अशा स्पष्ट सूचना महामार्गाच्या कामाचे ठेकेदार कल्याण टोल प्लाझाच्या अधिकाऱ्यांना काही महिन्यापूर्वीच पत्राद्वारे कळिवले होते. त्यानुसार काम करताना काळजी घेण्याची गरज असतानाही ती न घेतल्याने नागरिकांचे नुकसान झाले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी कल्याण टोल प्लाझाची आहे.
>
> **– सुप्रिया महाडिक, सरपंच, नागोठणे**

> महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी व वरिष्ठांकडून असल्याने आणि पावसाळा कमी झाल्याने महामार्गाचे काम आम्ही सुरू केले. मात्र, एवढ्या मोठ्या जोरात पाऊस येईल याची कल्पना नसल्याने अचानक आलेल्या पावसामुळे हे पाणी आंगर आळीत गेले. भविष्यात महामार्गाचे काम करताना योग्य ती काळजी घेऊ.
>
> **– विजय छत्रे, वरिष्ठ अधिकारी, कल्याण टोल प्लाझा**

## हृदयविकाराच्या झटक्याने तरूणाचा मृत्यू

- गाडीवरील ताबा सुटल्याने अपघात
- रस्त्यालगत असलेल्या गाळ्याचे नुकसान

| रायगड | प्रतिनिधी |

दिवाळीच्या उत्साहात जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. कर्जत तालुक्यातील नेरळ परिसरात, पिंपळोली गावचे रहिवासी आणि मिठाई व्यवसायीक मल्हार सोनावळे (३०) यांचे गुरुवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. नेरळ-कोल्हारे मार्गावर साई मंदिर नाका येथे कार चालवत असताना त्यांना अस्वस्थ वाटले आणि गाडीवरील ताबा सुटल्याने अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, मल्हार सोनावळे हे नेरळमधील आपले काम संपवून पिंपळोली येथील घरी परतत होते. गुडवण-सुगवे रस्त्याने जात असताना त्यांना अचानक त्रास जाणवला. त्यामुळे त्यांची कार रस्त्यालगत असलेल्या एका दुकानाच्या गाळ्यात घुसली. हा अपघात इतका जोरदार होता की गाळ्याचे मोठे नुकसान झाले. मात्र, कारमधील एअरबॅग उघडल्यामुळे मल्हार यांना बाह्य जखमा झाल्या नाहीत. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन त्यांना कारमधून बाहेर काढले आणि रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी केली असता, त्यांना मृत घोषित करण्यात आले. वैद्यकीय अहवालानुसार, मृत्यूचे कारण हृदयविकाराचा झटका असल्याचे स्पष्ट झाले. त्यांच्या या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



● दिवाळीच्या सुट्टीत मुरुड समुद्रकिनारी सुर्यास्तावेळी पर्यटक घोडागाडी रपेट मारताना. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## नवी मुंबई विमानतळाला मोदींचे नाव?

### राजाभाऊ ठाकूर यांचा खळबळजनक दावा

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा कॉंग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांनी एका मुलाखतीदरम्यान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामांकनावरून खळबळजनक दावा केला आहे. ठाकूर यांनी प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांच्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर संशय व्यक्त केला आहे.



राजाभाऊ ठाकूर यांनी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे तारणहार, ज्यांनी साडेबारा टक्के भूखंडाचा प्रश्न मार्गी लावला, त्या दि.बा. पाटील यांचेच नाव दिले पाहिजे, ही स्थानिक भूमिपुत्रांची मागणी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, त्यांनी सिडकोने विमानतळासाठी वापरलेल्या 'एनएमआयएएल' (नवी मुंबई किंवा नरेंद्र मोदी इंटरनॅशनल एअरपोर्ट लीमीटेड) या इंग्रजी आद्याक्षरांवरून त्यांनी संशय व्यक्त केला. ही आद्याक्षरे इतर कोणाच्यातरी नावाचे संकेत देत आहेत. जर स्थानिकांनी विरोध केला नसता तर विमानतळाला एनएमआय या आद्याक्षरांवरून नाव मळािले असते, असा खळबळजनक आरोपही त्यांनी केला आहे.

ते पुढे बोलताना म्हणाले की, अन्याय होत असताना आजकालचे राजकीय नेते ईडी आणि सीबीआयच्या भीतीने गप्प बसतात. ते कॉन्ट्रॅक्ट आणि कमिशनच्या जाळ्यात अडकले आहेत. माजी आमदार स्वर्गीय मधुकर ठाकूर असते तर त्यांनी लोकनेते दि.बा पाटील यांचे नाव विमानतळाला मळािवे यासाठी मोठी आंदोलने केली असती व सरकारला नाव द्यायला भाग पाडले असते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## वृद्धाश्रमात दिवाळी साजरी



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील परहूर येथील श्री समर्थ कृपा वृद्धाश्रमात दिवाळी साजरी करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासूनची ही परंपरा आगरी समाजसेवा मंडळाने जपली असून या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतूक करण्यात येत आहे.

अॅड. जयेंद्र गुंजाळ संचलित वृद्धधामात यंदाही आगरी समाजसेवा मंडळाने वृद्धांना दिवाळीचा फराळ वाटप केला. त्यांच्यासोबत फराळाचा आनंद घेत दिवाळी उत्सव साजरा केला. यावेळी प्रास्ताविक दामोदर पाटील यांनी केले असून जयेंद्र गुंजाळ यांनी सर्वांची ओळख करून दिली. वृद्धांसोबत संवाद साधत एकमेकांना बोलते केले. एका गायकाने सुरेल आवाजात गाण्यांचे सादरीकरण केले. सर्वांनी एकत्र फराळ करुन कार्यक्रमाची सांगता झाली. वृद्धांचे आजार, त्यांची मानसिकता सांभाळणे असे अवघड काम अॅड. गुंजाळ सहजतेने करत असल्याचे कौतूक उपस्थितांनी केले. अध्यक्ष विलास ठाकूर यांनी समारोपाचे भाषण केले.

## बनावट मतदार याद्यांविरोधात मोर्चा

| कोर्लई | प्रतिनिधी |

बनावट मतदार यद्यांविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे शनिवारी (दि.१) मुंबईत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील पदाधिकारी व सर्व मनसैनिकांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन उपजिल्हाध्यक्ष शैलेश खोत यांनी केले आहे. खोट्या मतदार यादी विरोधातील या मोर्चात सर्व खऱ्या मतदारांनी व मनसेच्या जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व मनसैनिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्यासाठी शनिवारी दुपारी चर्चगेट येथे हजर राहावे, असे आवाहन उपजिल्हाध्यक्ष शैलेश खोत यांनी केले आहे.

## सुधाकर पाटील यांनी घडविले चारधाम यात्रेचे दर्शन



| उरण | प्रतिनिधी |

शेकापचे चिर्ले ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर पाटील यांचे सुपुत्र तथा आर्यन ग्रुप ऑफ कंपनीचे संचालक समीर पाटील यांनी दिपावली निमित्ताने गावातील १५० नागरीकांना चारधाम यात्रेचे दर्शन घडविण्याचे काम केले. ही यात्रा सफल झाल्याने मोठ्या भक्तिभावाने यात्रेकरूंनी आभार व्यक्त केले आहे.

देशात हिंदू धर्मात चारधाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मियांचीही मोठी तीर्थस्थळे आहेत जिथे आयुष्यात एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. परंतु गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे वा कोणी सोबत नसल्याने त्यांचे स्वप्न पूर्ण होत नाही. मात्र, आपण ज्या गावात जन्मलो त्या गावाच्या मातीचे ऋण फेडण्याचे काम विविध सामाजिक उपक्रम राबवित शेकापचे चिर्ले ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच सुधाकर पाटील व समीर पाटील या पितापुत्रांने केले आहे.

## चौलमध्ये कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

वयाची ७५ वर्षे पुर्ण करणारे ज्येष्ठ नागरीक यांचा सन्मान तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना अलिबाग तालुक्यातील चौल येथील नारायण नाईक प्रतिष्ठानच्यावतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रमुख अतिथी सर्वाहारा जनआंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य तथा शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, चौलचे माजी सरपंच प्रवीण राऊत, उपसरपंच अजित गुरव, ग्रामपंचायत सदस्य अतुल वर्तक, माजी सरपंच मधुकर फुंडे, चौल ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रमेश नाईक, माजी अध्यक्ष रमेश म्हात्रे, रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण रक्षणासाठी काम करणारे शैलेश राईलकर यांना समाज कार्य गौरव पुरस्कार, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्त व कचरा मुक्त गाव याकरीता कार्यरत असलेले राकेश काठे यांना राजाभाऊ राईलकर पर्यावरण स्नेही पुरस्कार, पत्रकार प्रफुल्ल पवार यांना लोकहितकारी पत्रकारीता पुरस्कार, आदेश नाईक व योगिता नाईक या दाम्पत्याला कृषि मित्र पुरस्कार तसेच सागर थळे यांचा सांस्कृतिक कार्य गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. चौल ग्रामपंचायत माजी सरपंच तसेच अलिबाग पंचायत समिती माजी सदस्य विश्वनाथ मळेकर यांना गौरवण्यात आले. गावातील अमृत महोत्सवी वयोमान (७५ वर्षे) असलेल्या ४८ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नारायण नाईक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभाकर नाईक यांनी केले. विश्वस्त नंदकुमार नाईक, मंगेश नाईक, ललिता म्हात्रे, राजश्री नाईक, भक्ती रानवडे यांनी स्वागत केले. महेंद्र नाईक यांनी आभार व्यक्त केले असून सागर थळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास संयोजन समिती सदस्य मदन ठाकूर, हरिश्चंद्र म्हात्रे, सुधाकर राऊळ, हर्षदा म्हात्रे, जयवंत कंटक तसेच उत्कर्ष महिला मंडळ, युवक मंडळ यांनी सहकार्य केले.

**व्यावसायिक सुखावले | बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी**

# दिवाळी सुट्टीत पाली हाऊसफुल्ल

| पाली/बेणसे| प्रतिनिधी |

दिवाळी सुट्यांमध्ये अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. शुक्रवार व शनिवारपासून पालीत भाविकांची मोठी रेलचेल सुरू झाली आहे. शाळा व महाविद्यालयांना दिवाळीच्या सुट्ट्या अजून ८ ते १० दिवस असल्यामुळे पालीत भाविकांची मोठी वदर्ळ आहे. त्यामुळे येथील हॉटेल व्यावसायिक व दुकानदारांचा धंदा तेजीत आला आहे. मात्र, भाविकांच्या व इतर वाहनांमूळे पालीत वाहतुक कोंडी वाढत आहे.

बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दाखल होत आहेत. त्यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल होत असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत. पाली सुधागडात अनेक धार्मिक व पर्यटन स्थळे आहेत, पालीत आलेले भाविक सभोवतालच्या पर्यटन स्थळांना देखील आवर्जून भेट देताना दिसत आहेत. दिवाळी निमित्त मंदिराला विद्युत रोषणाई व आकर्षक फुलांची सजावट केली आहे. मंदिरात व मंदिराबाहेर मोठ्या व सुबक रांगोळ्या देखील काढल्या आहेत. दिवाळी सुट्ट्यांमुळे मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजली आहेत.



> भाविकांच्या येणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन योग्य व्यवस्थापन व नियोजन करण्यात आले. भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाणी व इतर व्यवस्था करण्यात आली. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद उपलब्ध आहे. सुरक्षारक्षक तैनात आहेत. भाविकांना राहण्यासाठी सुसज्ज सर्व सोयी सुविधांनी युक्त आधुनिक दोन भक्त निवास आहेत. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानाची मोफत पार्किंग देखील आहे. तसेच, सुसज्ज स्वच्छता गृह देखिल उभारण्यात आले आहेत. **– जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**



लॉजिंग बोर्डिंग वाल्यांचे आगाऊ बुकिंग झाले आहे. सध्या मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली आहे. यादरम्यान, पालीतील रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. नाक्यावर तैनात असलेले वाहतूक पोलीस व बल्लाळेश्वर मंदिर ट्रस्टचे सुरक्षा रक्षक वाहतुक सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### वाहतुक कोंडी जटिल

येथील अरुंद रस्ते, विनाप्रवेशमधुन जाणारी वाहने, मोठ्या व अवजड वाहनांची रेलचेल, वाहतुकीचे नियम मोडणारे वाहन चालक आदी कारणांमुळे पालीत वारंवार वाहतूक कोंडी होते. सुट्ट्यांमुळे मोठ्या प्रमाणात गाड्या व बसेस पालीत दाखल होत आहेत. अरुंद रस्त्यामुळे व अवैध पार्किंगमुळे दोन्ही बाजुने आलेल्या वाहनांना जाण्यासाठी जागा मळित नाही. परिणामी वाहने अडकून पडून वाहतूक कोंडी होते. हे थांबविण्यासाठी बाह्यवळण मार्ग लवकर करण्याची मागणी होत आहे.

# कृषी संशोधक विद्यार्थी वाऱ्यावर

## • दोन वर्षांपासून शिष्यवृत्ती देण्यास सरकारकडून टाळाटाळ

। रायगड । प्रतिनिधी ।

कृषी क्षेत्रातील उच्चस्तरीय संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून पीएच.डी कृषी फेलोशिप योजना सुरू करण्यात आली असून या शिष्यवृत्तीद्वारे पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, संशोधनासाठी आवश्यक सुविधा आणि व्यावसायिक प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली जाते.

मात्र मागील दोन वर्षांपासून कृषी क्षेत्रातून पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच देण्यात आलेली नाही. वारंवार मागण्या करून, तसेच मंत्रिमंडळामध्ये विषय मांडण्याचे आश्वासन देऊन सरकारने विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

बदलते हवामान, जमिनीची उद्ध्वस्त स्थिती आणि उत्पादन क्षमता वाढवण्याच्या गरजेमुळे कृषी संशोधनात नवकल्पना आणि प्रगत अभ्यासाची नितांत गरज भासत आहे. या



पार्श्वभूमीवर, कृषी क्षेत्रातील उच्चस्तरीय संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी विविध संस्था आणि शासन स्तरावर पीएच.डी. कृषी फेलोशिप योजना सुरू करण्यात आल्या.

यामध्ये विद्यार्थ्यांना बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व आर्टी संस्थांच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र मागील दोन वर्षांपासून सरकारकडून पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच देण्यात आलेली नाही. राज्यातील जवळपास १०० हून अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत. यापैकी अनेक विद्यार्थी हे पीएच.डी प्रवेश परीक्षेमध्ये अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

शिष्यवृत्ती मिळावी यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी दोन वर्षांपासून सातत्याने सरकारला निवेदने देऊन पाठपुरावा केला. मात्र सरकारकडून त्यावर कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने विद्यार्थ्यांनी १३ ते १७ ऑक्टोबरदरम्यान आझाद मैदानात आंदोलन केले. मात्र या आंदोलनादरम्यान कोणत्याही अधिकारी व नेत्यांनी संवाद न साधता दुर्लक्ष केल्याने विद्यार्थ्यांच्या संतापात भर पडली आहे.

दरम्यान आझाद मैदानामध्ये आंदोलन करण्यापूर्वी कृषीमधून पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुण्यामध्ये १५ ते २२ सप्टेंबरदरम्यान आठ दिवसांसाठी अन्नत्याग आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत विषय मांडण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी हे आंदोलन स्थगित केले. मात्र राज्यात अतिवृष्टी झाल्याचे कारण पुढे करीत पीएचडी कृषी संशोधक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा मुद्दा पुढे ढकलण्यात आला. मंत्रिमंडळाच्या चार बैठका होऊनही पीएचडी कृषी शिष्यवृत्तीचा विषय मंत्रिमंडळात मांडण्यात आला नाही, अशी खंत कृषी संशोधक विद्यार्थी समन्वयक कृती समितीचे प्रतिनिधी विश्वजित काळे यांनी व्यक्त केली.

# शाळांना लखपती होण्याची संधी

। रायगड । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री माझी शाळा उपक्रम लाभदायक ठरत असून, गेल्या दोन वर्षांपासून याद्वारे शाळेचे नामांकन व्हावे म्हणून सर्वच स्तरांतून प्रयत्न केले जात आहेत. यंदाही हा उपक्रम राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणार आल्याने शाळांना पुन्हा लखपती होण्याची संधी मिळणार आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांसाठी राज्य सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान १ जानेवारी २०२४ पासून सुरू केले आहे. राज्यात मुख्यमंत्री माझी शाळा उपक्रम ातील पहिला व दुसरा टप्पा यशस्वी झाल्यानंतर सरकारने पुन्हा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचा तिसरा टप्पा राबविण्याचा संकल्प केला आहे.

यात शाळांसाठी २०० गुणांचे मूल्यांकन राहणार असून, या अभियानांतर्गत सहभागी शाळांना तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर लाखोंची बक्षिसे देण्यात येणार आहेत.तिसऱ्या टप्प्यात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा इत्यादी घटकांबाबत जागृती करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना देणे, शासनाच्या ध्येय-धोरणाशी सुसंगत अशा शालेय प्रशासनाच्या बळकटीकरणास चालना देणे, शालेय शिक्षणाच्या दृष्टिकोनातून सर्वाधिक महत्त्वपूर्ण असलेल्या शैक्षणिक संपादणूक या घटकाच्या बुद्धीस प्रोत्साहन देणे, असे या तिसऱ्या टप्प्यातील अभियानाचे उद्दिष्ट आहे. ३ नोव्हेंबर रोजी औपचारिक कार्यक्रमाद्वारे अभियानाची सुरुवात होणार आहे. या अभियानाचा कालावधी डिसेंबर २०२५ रोजी पूर्ण होणार आहे.

या अभियानात सहभागी होऊन एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या शाळांचे मूल्यांकन व गुणांकनासाठी पायाभूत सुविधा ३८ गुण, शासन ध्येय-धोरण अंमलबजावणी १०१ गुण, शैक्षणिक संपादन ६१ गुण, अशी २०० गुणांची ही स्पर्धा असणार आहे. या अभियानांतर्गत शासनातर्फे तालुकास्तर, जिल्हास्तर व विभाग, राज्यस्तरापर्यंत शाळांना लाखोंची बक्षिसे देण्यात येणार आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे कुंडलज, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रूपये | पैसे |
| पुरब सुरेश जैन (ओसवाल) व इतर | ४० | १/अ | ०-४०-०० | १ | ४५ |
| | ४० | १/ब | ०-१६-०० | १ | ६० |
| | ४८ | १/ब | ०-४०-०० | ३ | २० |
| | ४९ | २/अ | ०-३३-०० | ४ | ११ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-

**ॲड. जयेश संभाजी म्हसे**

दिनांक :- २७/१०/२०२५

मो.नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

ई मेल :-adv.jayeshmhase@gmail.com

## मढेघाट बारव दीपोत्सव साजरा

**तळा :** मढेघाट पायथ्याशी असलेल्या बारव परिसरात यंदाही दीपोत्सव दिमाखात साजरा झाला. साद सह्याद्री प्रतिष्ठान गेल्या सात वर्षांपासून लक्ष्मीपूजन निमित्त या ठिकाणी दीपोत्सवाचे आयोजन करीत असून या सांस्कृतिक वारशाला नवसंजीवनी मिळत आहे. कार्यक्रमास नारायण वाडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी तरुणांना समाजकार्य, शिवकार्यात योगदान आणि आपल्या इतिहासाशी घट्ट नाते जोडण्याचे आवाहन केले. यावेळी मनाली मालुसरे, लावण्या पवार आणि दिक्षा सुभे यांनी शिवव्याख्यान सादर करत उपस्थितांमध्ये शिवप्रेम आणि देशभक्तीची भावना जागवली. या ऐतिहासिक बारवचे आर्किटेक्चरल डोक्युमेंटेशन करून त्याचे संवर्धन करण्याचे कार्य साद सह्याद्री प्रतिष्ठान सातत्याने करत असून दीपोत्सवाच्या माध्यमातून वारशाचा अभिमान जपण्याचा आणि पुढील पिढीसमोर मांडण्याचा प्रयत्न होत आहे.

# सलग सुट्ट्यांमुळे रायगडच्या किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी




। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात पर्यटन हंगाम जोमात सुरू झाला आहे, दिवाळीचा सण आणि सलग सुट्ट्यांमुळे रायगडच्या किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी वाढली आहे. त्यामुळे अलिबाग मुरुडसह जिल्ह्यातील बहुतांश पर्यटन स्थळे हाऊसफुल झाले आहेत. पर्यटकांच्या आगमनाने व्यावसायिकदेखील खुश झाले आहेत.

पावसाळ्यातील चार महिने कोकणात मुसळधार पाऊस पडतो. त्यामुळे मुंबईतून होणारी जल प्रवासी वाहतुक बंद असते. त्यामुळे पावसाळ्यात पर्यटन व्यवसायावर मंदीचे सावट असते. तुरळक पर्यटक येत असतात. पण पावसाळा संपला की कोकण किनारपट्टीवरील पर्यटन हंगाम पुन्हा जोमाने सुरू होतो. दिवाळीपासून फेब्रुवारी महिन्या पर्यंत तर एप्रिल पासून जून महिन्यापर्यंत पर्यटकांची मोठी रेलचेल या ठिकाणी पहायला मिळते. सध्या याची प्रचिती रायगड मधील अलिबाग, मुरुड आणि श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळांवर येत आहे आहे.

सलग सुट्ट्यामुळे अलिबाग मधील आवास, सासवणे, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी. नागाव, चौल आणि रेवदंडा येथे साधारणपणे २५ हजार पर्यटक दाखल झाले होते. तर मुरुड तालुक्यातील काशिद, नांदगाव, मुरुड १५ हजारहून अधिक पर्यटक दाखल झाले होते. याखेरीज श्रीवर्धनमधील दिवेआगर, हरिहरेश्वर याठिकाणीदेखील गर्दी झाली आहे. पर्यटकांच्या आगमनामुळे समुद्रकिनारे फुलून गेले आहेत. स्थानिक व्यवसायिकांना यामुळे रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. बोटींग व्यवसायिक, वेगवेगळे साहसी जलक्रीडा प्रकार, स्टॉलधारक, नारळ विक्रेते यांचे व्यवसाय तेजीत असल्याचे पहायला मिळत होते. पर्यटकांनी समुद्र स्नानाबरोबरच सागरी सफरीचा आनंद लुटला, एटीव्हीराईडस, बनाना राईडस अशा विविध प्रकारांचा आनंद लुटला. पर्यटकांचा ओघ वाढल्याने जिल्ह्यातील हॉटेल्स आणि लॉजेस पर्यटकांनी गजबजून गेले होते.

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे ढवर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन शेतजमिन मिळकती श्री. देवेंद्र यशवंत मंचेकर व सौ. निलांगी देवेंद्र मंचेकर, राहणार प्रभादेवी, मुंबई यांच्या निर्बंध मालकी हक्काच्या असून, सदर जमिन मिळकती, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. देवेंद्र यशवंत मंचेकर व सौ. निलांगी देवेंद्र मंचेकर, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती /संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही त-हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| ढवर, ता. अलिबाग. | ३३० | ०-१९-१० पो.ख.०-०२-३० एकूण ०-२१-४० | ०२-५० |
| ढवर, ता. अलिबाग | ३३१ | एकूण ०-०९-०० | ००-१७ |

अलिबाग,
दिनांक : २७/१०/२०२५

सही/

**(ॲड. संजय म. भगत)**

हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड, अलिबाग- रायगड. खरेदीदारांचे वकील

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| श्री. कमलेश नारायण मोरे | ९ | ६ | ०-३२-२० | ४ | ३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-

**ॲड. निलेश दामु मुंढे**

दिनांक :- २७/१०/२०२५

मो.नं. ८४४६८६९६७१

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी,ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

ई मेल : nileshmundhe029@gmail.com

# पर्यटकांच्या स्वागताला सिगल पक्षी

। मुरूड । प्रतिनिधी ।



निळेशार पाणी, समुद्राच्या लाटा, रुपेरी वाळू, नारळी-पोफळीच्या बागा, ऐतिहासिक जंजिरा, पद्मदुर्ग अशा जलदुर्गांमुळे पर्यटकांची पावले मुरूड परिसराकडे वळू लागली आहेत. अशातच थंडीच्या आगमनाचे संकेत मिळत असताना सिगल पक्ष्यांनी हजेरी लावली आहे.

मुरूड, आगरदांडा समुद्रकिनारा पर्यटकांचे आकर्षण आहे. सिगल पक्षी भक्ष्य म्हणून छोटे मासे, खेकडे पकडण्यासाठीची शिताफी, आकाशात विहार करण्याची शैली पाहण्यासाठी अनेकांची पावले समुद्रकिनाऱ्यावर वळतात. साधारण ऑक्टोबर ते जानेवारीदरम्यान हे स्थलांतरित पक्षी दाखल होतात. थंडीचा हंगाम सुरू होताच पक्ष्यांची गर्दी वाढू लागली आहे. त्यामुळे आगामी दोन-तीन महिने समुद्रकिनारे पक्ष्यांनी फुलून जाणार आहेत.

थंडीच्या कालावधीमध्ये लडाखमध्ये मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या बर्फामुळे पक्ष्यांना पुरेसे खाद्य मिळत नाही. त्यामुळे सिगल पक्षी काही कालावधीसाठी स्थलांतरित होतात. ते समुद्रकिनाऱ्याजवळ जिवंत छोटे मासे, खेकडे खाद्य खातात.

## महिलेच्या पोटातून काढली गाठ

। रोहा । प्रतिनिधी ।

एका वृद्ध महिलेच्या पोटातून ४ किलो वजनाची गाठ काढून तिच्यावर डॉ. अपूर्व भट यांना यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. एक ७५ वर्षाच्या वृद्ध महिलेचा पोटाचा आकार काही दिवसांपासून वाढत होता.

तिच्या नातेवाईकांनी उपचारासाठी तीला घेऊन रोह्यातील डॉ. अपूर्व भट यांचे हॉस्पिटल आणले व सर्व हकीकत डॉक्टरांच्या समोर मांडली. डॉ.अपूर्व भट यांनी वृद्ध महिलेच्या काही तपासण्या केल्यावर पोटात खूप मोठी गाठ असल्याचे लक्षात आहे. त्यानंतर त्या वृद्ध महिलेवर सुनियोजित पद्धतीने शस्त्रक्रिया करण्यात आली. या दरम्यान पोटातील ही गाठ गर्भ पिशवीमध्ये तयार झाली होती. ही गाठ पोटात मोठे आतडे, मूत्रनलिका अशा अवयवांना चिकटलेली होती. यशस्वी शस्त्रक्रियेनंतर या नाजूक व महत्त्वाच्या अवयवांपासून ही गाठ सोडवून यशस्वीपणे बाहेर काढली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुदर्शन रामचंद्र पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | २६७/२ | ०-६२-७० | १८.२८ |
| | | पो. ख. ०-०४-८० | |
| | | ०-६७-५० | |

पैकी श्री. सुदर्शन रामचंद्र पाटील यांच्या मालकीच्या ० हेक्टर ४६.५० आर क्षेत्रापैकी १६ आर एवढी मिळकत.

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २७/१०/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**

रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

मो. नं. ९४२२३७५११५

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

प्रधान मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे द्वारे खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टल वर ई-निविदा माध्यमाने सिंगल बिड सिस्टीममध्ये खुली निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नाव: कोंकण रेल्वे वरील रत्नागिरी प्रदेशातील नाटूवाडी, करबुडे, टिके आणि बेर्डेवाडी टनल्समध्ये वाहतुकीखाली असलेल्या बॅलेस्टलेस ट्रॅकची दुरुस्ती. निविदा सूचना क्र: केआर-डब्ल्यू-1-58-2025-16. अंदाजित खर्च**: रु. 1,23,75,226/-, जीएसटी वगळून. **बंद होण्याची तारीख/वेळ**: 17.11.2025 रोजी 15:00 वा. पर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव/बोली जमा करण्यासाठी. **काम पूर्णत्वाचा कालावधी**: सहा महिने, मानसूनसह. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही. कृपया अधिक माहिती/सहभाग करण्यासाठी संकेतस्थळ **https://ireps.gov.in** पहा. शुद्धीपत्रक/परिशिष्ट फक्त सदर संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

# सन्मानजनक जागा न दिल्यास रिपाई रिंगणात

## • राहुल सोनावळे यांचा इशारा

। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व नगरपंचायती निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सन्मानजनक जागा न दिल्यास स्वतंत्रपणे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेणार असल्याचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख राहुल सोनावळे यांनी सांगितले.



राहुल भाई सोनावळे यांनी रविवारी (दि. २६) पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, रायगड जिल्ह्यात रिपाईची ताकद वाखाणण्याजोगी आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपाईची संघटनात्मक वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये रिपाईला सन्मानजनक जागा मिळाल्याच पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली.

त्यांनी पुढे सांगितले की, रिपाईने अनेक निवडणुकांमध्ये महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे यावेळी आम्हालाही सत्तेत योग्य तो वाटा मिळावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली. महायुतीने रिपाईकडे योग्य तो सन्मान राखून जागावाटप न केल्यास कार्यकर्त्यांशी संपर्क साधून स्वतंत्र लढतीचा निर्णय घेण्यात येईल, असे सोनावळे यांनी स्पष्ट केले. रायगड जिल्ह्यातील रिपाई कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून सन्मानजनक जागांसाठी जनतेतून व पक्षातूनही मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे, असेही रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुल सोनावळे म्हणाले.

# शिक्षक सीटीईटी परीक्षेची तारीख जाहीर

मुंबई : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली असून ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी देशातील १३२ शहरांमध्ये होणार आहे.

शिक्षक होण्यासाठीची टीईटी किंवा सीटीईटी यातील कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. त्यानुसार राज्य परीक्षा परिषदेतर्फे राज्यस्तरावरील शिक्षक पात्रता परीक्षेचे (टीईटी) आयोजन केले जाते. तर सीबीएसईतर्फे राष्ट्रीय पातळीवर सीटीईटी ही परीक्षा घेण्यात येते.

सीबीएसईतर्फे वर्षातून दोन वेळा परीक्षेचे आयोजन केले जाते.सीबीएसईने सीटीईटीचे वेळापत्रक जाहीर केले असून ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सीटीईटीचा पेपर १ आणि पेपर २ होणार आहे. एकूण २० भाषांमध्ये ही परीक्षा घेतली जाणार आहे.

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| **Tend-5/25-26 7000037416 2nd call** | Procurement of 33kV PT & 22kV PT required at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Rs. 540724/-** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 24.10.2025 to 04.11.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 04.11.2025 @ 11:30 Hrs.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202 E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# निवडक

## ऑस्ट्रेलियाचा एकतर्फी विजय

**इंदूर :** ऑस्ट्रेलियाची लेग स्पिनर ॲलाना किंगने अवघ्या १८ धावांत ७ बळी घेतल्यानंतर ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा अक्षरशः धुव्वा उडवला. आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा डाव अवघ्या ९७ धावांत संपुष्टात आणला आणि १६.५ षटकांत ३ बाद ९८ धावांसह एकतर्फी विजय संपादन केला. ऑस्ट्रेलियाची हंगामी कर्णधार ताहलिया मॅकग्राने नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. मात्र, किंगच्या भेदक माऱ्यासमोर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी अक्षरशः नांगी टाकली. यादरम्यान, ॲलाना महिला विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात ७ बळी घेणारी पहिलीच गोलंदाज ठरली. तिने ४३ वर्षे जुना विक्रम मोडला.



## निधी भिडेला कांस्यपदक

**रत्नागिरी :** लातूर येथे झालेल्या १४ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेत फाटक हायस्कूल व गांगण, केळकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या आठवीतील निधी शरद भिडे हिने २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात कांस्य पदकाची कमाई केली. यशाची घौडदौड कायम राखणाऱ्या निधीच्या यशाने शाळेबरोबरच जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे. शासकीय आणि असोसिएशनच्या स्पर्धांमध्ये सातत्याने यश संपादन करणाऱ्या रत्नागिरीच्या निधी भिडेने जलतरण तलाव रत्नागिरी येथे झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत २०० मीटर बटरफ्लाय, २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक आणि १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक अशा तिन्ही प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त केले होते. सांगली येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात रौप्य पदक आणि १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त केले. लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेतील कोल्हापूर विभागाचे नेतृत्व करत २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात चमकदार कामगिरी करत कांस्य पदकाची कमाई केली. तिच्या या यशाबद्दल संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक राजन कीर, उपमुख्याध्यापक विश्वेश जोशी, पर्यवेक्षिका नेहा शेट्ये, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## बॅडमिंटन स्पर्धेत कोंकण विभागाला उपविजेतेपद

**रत्नागिरी :** मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन दादोजी कोंडदेव क्रीडा संकुल, ठाणे येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत कोंकण विभाग महिला बॅडमिंटन संघात श्रुती फणसे (गोगटे जोगळेकर महाविद्यालय स्वायत्त रत्नागिरी), श्रेया श्रीकांत सामंत (संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ), सभा अब्दुलकरीम शेख (बी. के. वेंगुर्ला महाविद्यालय,वेंगुर्ला), सेजल सुनील कदम, महेनूर रफिक खान (डी.बी.जे.महाविद्यालय, चिपळूण) या विद्यार्थिनींची मुंबई विद्यापीठ महिला बॅडमिंटन स्पर्धेकरिता कोकण विभाग महिला बॅडमिंटन संघात निवड झाली होती.कोंकण विभाग महिला बॅडमिंटन संघाला क्रीडा संचालक डॉ. विनोद शिंदे, क्रीडा शिक्षक प्रा.क्रिस्टन सॅबेस्टियन रॉड्रिक्स, प्रा.कल्पेश बोटके तसेच माधव फणसे यांचे मार्गदर्शन लाभले.मुंबई विद्यापीठ महिला बॅडमिंटन स्पर्धेतील रौप्य पदक आणि उपविजेतेपद प्राप्त करणाऱ्या कोंकण विभाग-४ महिला बॅडमिंटन संघाला र. ए. सोसायटीच्या कार्याध्यक्षा शिल्पा पटवर्धन, कार्यवाह सतीश शेवडे. जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ चंद्रशेखर केळकर, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, कोंकण विभाग -४ चे कमिटी सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, ती-नही शाखांचे उपप्राचार्य, जिमखाना कमिटीचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भिडे, सर्व प्राध्यापक सहकारी, कर्मचारी, सेवक यांनी अभिनंदन केले.

## शान मसूद पीसीबीचा नवा सल्लागार

लाहोर : पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सध्याचा कसोटी कर्णधार शान मसूद यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि खेळाडू व्यवहार सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे, ही एक नवीन प्रशासकीय जबाबदारी आहे. मसूदपूर्वी, पीसीबीने कधीही या दर्जाच्या भूमिकेसाठी सक्रिय आंतरराष्ट्रीय खेळाडूची नियुक्ती केली नव्हती. पीसीबीने सांगितले की हे पद तात्पुरते देण्यात आले आहे आणि भविष्यात मसूदला आंतरराष्ट्रीय क्रिकेट संचालक देखील बनवता येईल.बहुतेक क्रिकेट बोर्डांमध्ये ही भूमिका एक वरिष्ठ प्रशासकीय पद आहे.पीसीबी आधीच या पदासाठी अर्ज मागवत आहे, ज्याची अंतिम मुदत २ नोव्हेंबर आहे. मसूद सध्या अंतरिम आधारावर काम करतील.

# ऑस्ट्रेलिया पॅरा बॅडमिंटनमध्ये भारताला ११ पदके

## ८ सुवर्ण आणि ३ रौप्य पदकांची केली कमाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

ऑस्ट्रेलिया पॅरा बॅडमिंटन इंटरनॅशनल २०२५ मध्ये भारतीय पॅरा-बॅडमिंटन खेळाडूंनी शानदार कामगिरी करत पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावले. पॅरालिम्पिक चॅम्पियन प्रमोद भगतने दोन सुवर्णपदके जिंकली, तर सुकांत कदमने एक सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकले.

प्रमोद भगतने पुरुष एकेरी ३ प्रकारात सुवर्णपदक जिंकले, अंतिम सामन्यात त्याचा सहकारी खेळाडू मनोज सरकारचा २१-१५, २१-१७ असा पराभव केला. त्यानंतर भगतने सुकांत कदमसोबत जोडी करून पुरुष दुहेरी ३-४ चे विजेतेपद जिंकले. अंतिम सामन्यात भारतीय जोडीने उमेश विक्रम कुमार आणि सूर्यकांत यादव यांचा २१-११, १९-२१, २१-१८ असा पराभव केला.



विजयानंतर भगत म्हणाले, दोन सुवर्णपदके जिंकून मला खूप आनंद झाला आहे. मनोजविरुद्धचा सामना कठीण होता कारण आम्ही दोघेही एकमेकांचा खेळ चांगल्या प्रकारे जाणतो. भारतासाठी ही एक उत्तम कामगिरी आहे. सुकांत कदमने पुरुष एकेरी ४ प्रकारात रौप्य पदक जिंकले, अंतिम फेरीत सूर्यकांत यादवकडून २१-२३, २१-१४, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

भारताच्या मानसी जोशीनेही शानदार कामगिरी करत दोन सुवर्णपदके जिंकली. तिने महिला एकेरी ३ प्रकारात सुवर्णपदक जिंकले आणि रूथिक रघुपतीसोबत जोडी करून दुहेरी ३-५ विजेतेपद पटकावले. रूथिकने चिराग बरेथासोबत पुरुष दुहेरी ५ प्रकारात आणखी एक सुवर्णपदक जिंकले.

पुरुष दुहेरीच्या ६ प्रकारात, शिवराजन सोलाईमलाईने सुवर्ण आणि सुदर्शन मुथुस्वामीने रौप्य पदक जिंकले.यशोधन रावणकोले आणि धीरज सैनी यांनी पुरुष दुहेरीच्या ५ प्रकारातही सुवर्णपदक जिंकले. महिला एकेरी ४ + ५ प्रकारात सरुमतीने ऑस्ट्रेलियाच्या जश्का गुनसनचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.

# यू मुंबावर पटना पायरेट्सचा विजय!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील प्ले-इन्स २ फेरीतील सामना यू मुंबा आणि पटना पायरेट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पटना पायरेट्स संघातील खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. यासह यू मुंबावर ९ गुणांनी विजय मिळवला. या विजयासह पटना पायरेट्सने एलिमिनेटर १ फेरीत प्रवेश केला आहे.

या सामन्यात यू मुंबाकडून अजित चौहान पहिली चढाई करण्यासाठी आला. पण त्याला एकही गुण घेता आला नाही. त्यानंतर पटना पायरेट्सकडून अयान चढाईला आला. पण यू मुंबाने त्याची पकड करत संघाचं खातं उघडलं. सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ बरोबरीत होते. अजित चौहानने ८ व्या मिनिटाला ४ गुणांची रेड सुपर रेड केली आणि यू मुंबाला २ गुणांनी आघाडी मिळवून दिली. पूर्वार्धातील १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर यू मुंबाचा संघ १ गुणाने आघाडीवर होता.

पूर्वार्धातील पुढील ५ मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीचा सामना रंगला. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पटना पायरेट्स संघ एक गुणाने आघाडीवर होता. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना यू मुंबाचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पटना पायरेट्सने २०-१३ गुणांसह ७ गुणांची आघाडी घेतली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ संपल्यानंतर पटना पायरेट्सचा संघ ५ गुणांनी आघाडीवर होता.उत्तरार्धात यू मुंबाला ५ गुणांची पिछाडी भरून काढायची होती. सुरुवातीला पटना पायरेट्सचा संघ ५ गुणांनी आघाडीवर होता. पूर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पटना पायरेट्सचा संघ ६ गुणांनी आघाडीवर होता. पटना पायरेट्सचा संघ आघाडीवर होता. त्यावेळी शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना अजित चौहानने २ गुण घेत पिछाडी कमी केली. पटना पायरेट्सचा संघ ३२-२६ गुणांसह ६ गुणांनी आघाडीवर होता. शेवटची ४ मिनिटे शिल्लक असताना अजित चौहानने आपलं सुपर १० पूर्ण केलं. पण पटनाकडे ५ गुणांची आघाडी होती. शेवटची ८ मिनिटे शिल्लक असताना पटना पायरेट्सचा संघ ८ गुणांनी आघाडीवर होता.

# अजिंक्य-ऋतुराजचा शतकी धमाका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रणजी ट्रॉफीच्या दुसऱ्या फेरीत अजिंक्य रहाणे आणि ऋतुराज गायकवाड यांनी अनुक्रमे मुंबई आणि महाराष्ट्रासाठी चमकदार कामगिरी केली. रहाणेने छत्तीसगढविरुद्ध शतक ठोकले. ऋतुराज गायकवाडने चंदिगढविरुद्ध शतक केले.

रणजी ट्रॉफी स्पर्धेतील दुसऱ्या फेरीत अजिंक्य रहाणे मुंबईसाठी, तर ऋतुराज गायकवाड महाराष्ट्रासाठी चमकला आहे. दुसऱ्या फेरीत मुंबईचा संघ छत्तीसगढविरुद्ध मुंबईतील बीकेसी ग्राऊंडवर सामना खेळत आहे. तसेच महाराष्ट्राचा सामना चंदिगढविरुद्ध चंदिगढमध्येच सेक्टर १६ मधील क्रिकेट स्टेडियममध्ये सुरू आहे. अजिंक्य रहाणेला गवसला सूरछत्तीसगढने नाणेफेक जिंकून मुंबईला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. छत्तीसगढने प्रथम गोलंदाजी करताना चांगली सुरुवात केली होती. मुंबईकडून सलामीला खेळायला आलेले अंगक्रिश रघुवंशी आणि मुशीर खान स्वस्तात बाद झाले. रघुवंशीला रवी किरणने ९ धावांवर बाद केले, तर मुशीरला आदित्य



सरवटेने १२ धावांवर बाद केले. तसेच हिमांशु सिंगही शून्यावर बाद झाला. त्यामुळे मुंबईची अवस्था ३ बाद ३८ अशी झाली होती. त्यावेळी अजिंक्य रहाणे आणि सिद्धेश लाड यांची जोडी एकत्र आली. त्यांनी आधी संघाला सावरलं आणि मग मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल सुरू केली. पाहाता पाहाता दोघांनी दीडशतकी भागीदारी करत संघाला २०० धावांचा टप्पा पार करून दिला. अजिंक्य रहाणेने शतक पूर्ण केले, तर सिद्धेशने अर्धशतक केले. रहाणेला पहिल्या सामन्यात जम्मू-काश्मीरविरुद्ध फारशी चांगली कामगिरी करता आली नव्हती. पण त्याला या सामन्यात सूर सापडला. रहाणेचे हे प्रथम श्रेणीमधील ४२ वे शतक ठरले.

दरम्यान, सिद्धेश १४६ चेंडूत ८० धावांवर बाद झाल्याने त्याची रहाणेसोबतची १६५ धावांची भागीदारी तुटली. तो बाद झाल्यानंतर लगेचच सर्फराज खानही १ धावेवर बाद झाला. सिद्धेशला अजय मंडलने बाद केले, तर सर्फराजला आदित्य सरवटेने बाद केले. पण नंतर शम्स मुलानीने रहाणेला काही वेळ साथ दिली. मात्र शतकानंतर रहाणेला रिटायर्ड हर्ट व्हावं लागलं.

# आंतरराष्ट्रीय मार्शल आर्ट्स खेळाडूची आत्महत्या

**। देवास । वृत्तसंस्था ।**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणारी देवास येथील जुजुत्सु (जपानी मार्शल आर्ट्स) खेळाडू रोहिणी कलाम (३५) हिने आत्महत्या केली. रविवारी, तिची धाकटी बहीण रोशनी कलाम हिला तिच्या अर्जुन नगर, राधागंज येथील राहत्या घरी तिच्या खोलीत फाशीला लटकलेला मृतदेह आढळला. तिला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.



घटनेच्या वेळी, तिची आई दुसऱ्या मुलीसोबत देवीच्या दर्शनासाठी बाहेर गेली होती, तर तिचे वडीलही कामासाठी घराबाहेर होते. रोहिणी सध्या आष्टा येथील एका खासगी शाळेत मार्शल आर्ट्स प्रशिक्षक म्हणून काम करत होती. शनिवारी ती देवास येथील तिच्या घरी परतली.

रोहिणी कलाम यांनी २००७ मध्ये त्यांच्या ॲथलेटिक कारकिर्दीला सुरुवात केली. २०१५ पासून त्या जुजुत्सुमध्ये व्यावसायिकरित्या स्पर्धा करत आहेत. गेल्या वर्षी अबू धाबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय जुजुत्सु स्पर्धेत तिने कांस्यपदक जिंकले. त्या जुजुत्सु असोसिएशनच्या सरचिटणीस देखील होत्या.

# गुकेश, दिव्याला युरोपियन क्लब कपमध्ये डबल गोल्ड

**। रोड्स। वृत्तसंस्था ।**

जागतिक बुद्धिबळ विजेते डी. गुकेश आणि दिव्या देशमुख यांनी युरोपियन क्लब कप बुद्धिबळ स्पर्धेत दुहेरी सुवर्णपदके जिंकली. ग्रँडमास्टर निहाल सरीन, अभिमन्यू आणि पुराणिक यांनीही प्रभावित केले.ग्रीसमधील रोड्स येथे खेळल्या गेलेल्या स्पर्धेत, गुकेशने सुपरचेस जिंकला आणि दिव्या देशमुखने सर्कल डी'एचेक्स डी मोंटे-कार्लोकडून खेळताना वैयक्तिक सुवर्णपदक जिंकले.



या वर्षीचा सांघिक स्पर्धा सुपरचेसने जिंकली, ज्यामध्ये अल्कलॉइड दुसऱ्या क्रमांकावर आणि गतविजेत्या नोव्ही बोर तिसऱ्या क्रमांकावर राहिला. युरोपियन बुद्धिबळ क्लब कप ही युरोपियन क्लब संघांसाठी वार्षिक स्पर्धा आहे, ज्यामध्ये जगातील सर्वोत्तम बुद्धिबळपटूंचा समावेश आहे.

खुल्या गटातील सांघिक स्पर्धेत, सुपरचेसने सात फेऱ्यांमध्ये १४ गुणांसह अंतिम फेरी गाठली, एकही सामना न गमावता. दरम्यान, अल्कलॉइडने सातपैकी सहा सामने जिंकून १२ गुणांसह दुसरे स्थान पटकावले. गेल्या वर्षीच्या विजेत्या नोव्ही बोरने १२ गुणांसह तिसरे स्थान पटकावले.

# सेरेनाचे कोकाटेंकडून अभिनंदन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बहरीनमधील मनामा येथे आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीमध्ये पूर्ण विजय मिळवत सुवर्ण पदक पटकावले. मुलींच्या संघात कांजूरमार्ग येथील खेळाडू कुमारी सेरेना सचिन म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. या कामगिरीबद्दल क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सेरेनासह भारतीय कबड्डी संघाचे अभिनंदन केले आहे.

१९ ते २३ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडलेल्या तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांजूरमार्ग येथील स्वराज्य स्पोर्ट्स क्लबची खेळाडू कुमारी सेरेना म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला.



मुले आणि मुली या दोन्ही भारतीय संघाने या स्पर्धेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करीत सुवर्णपदक पटकावून देशाचा मान उंचावला.

या उत्कृष्ट यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी कुमारी सेरेना म्हसकर हिचे तसेच प्रशिक्षक, पालक व स्वराज्य स्पोर्ट्स क्लबच्या व्यवस्थापनाचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले की, महाराष्ट्रातील तरुण खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेली कामगिरी ही राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे. शासनाकडून अशा प्रतिभावंत खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे सांगण्यात आले.

# ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूंचा विनयभंग

**इंदूर :** आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना खेळण्यासाठी इंदूरमध्ये आलेल्या ऑस्ट्रेलियन संघातील दोन खेळाडूंवर अत्याचार झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी पाच पोलिस ठाण्यांचे पथक तयार केले आणि त्याला अटक केली. गुरुवारी (२३ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता हॉटेल रॅडिसन ब्लू येथून कॅफे (द नेबरहूड) येथे दोन्ही महिला खेळाडू चालत जात होत्या. पांढरा शर्ट आणि काळी टोपी घातलेला एक तरुण दुचाकीवरून त्यांचा पाठलाग करू लागला. त्याने एका खेळाडूला अयोग्यरित्या स्पर्श केला आणि तेथून पळून गेला.

**कर्णधार हॅरी ब्रुकने १३५ धावा केल्या | जकारी फाउलकसने घेतल्या ४ विकेट**

# इंग्लंडचे न्यूझीलंडसमोर २२४ धावांचे लक्ष्य

**। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडने मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना जिंकण्यासाठी न्यूझीलंडसमोर २२४ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. प्रत्युत्तरात न्यूझीलंडने पहिल्या १८ षटकांत ४ गडी गमावून १०४ धावा केल्या आहेत. डॅरील मिशेल आणि मायकेल ब्रेसवेल क्रीजवर आहेत.टॉम लॅथम (२४), विल यंग (५), केन विल्यमसन (०) आणि रचिन रवींद्र (१७) यांना ब्रायडन कार्सने बाद केले.

माउंट मौंगानुई येथील बे ओव्हल येथे नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडचा संघ ३५.२ षटकांत २२३ धावांवर आटोपला.



कर्णधार हॅरी ब्रुकने सर्वाधिक १३५ धावा केल्या. जकारी फाउलकसने चार विकेट घेतल्या. २२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. संघाने २४ धावांत त्यांचे पहिले तीन बळी गमावले. दुसऱ्या षटकात ब्रायडन कार्सने विल यंग आणि केन विल्यमसन यांना बाद करून दबाव वाढवला. त्यानंतर पाचव्या षटकात मार्क वूडने रचिन रवींद्रला बाद केले. वूडला फक्त १७ धावा करता आल्या.

नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडची सुरुवात खराब झाली. त्यांच्या आघाडीच्या तीन फलंदाजांनी फक्त दोन धावा काढल्या. मॅट हेन्रीने पहिल्याच चेंडूवर जेमी स्मिथला बाद केले तेव्हा संघाला शून्यावर पहिला धक्का बसला. स्मिथला त्याचे खाते उघडता आले नाही. डावाच्या दुसऱ्या षटकात फाउलकसने बेन डकेट आणि जो रूट यांना बाद केले, ज्यांनी प्रत्येकी दोन धावा केल्या.तिथून, कर्णधार हॅरी ब्रुकने जबाबदारी घेतली आणि धावसंख्या २२३ पर्यंत नेली. त्याने आणि जिमी ओव्हरटनने सातव्या विकेटसाठी ८७ चेंडूत ८७ धावांची भागीदारी केली. ब्रुकने १०१ चेंडूत १३५ धावा केल्या. ब्रुकच्या खेळीत नऊ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता.इंग्लंडच्या ११ पैकी नऊ फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले नाहीत. संघाच्या पहिल्या चार फलंदाजांनी मिळून फक्त चार धावा केल्या.

# मेस्सी केरळ दौरा लांबणीवर

**। कोची । वृत्तसंस्था ।**

लिओनेल मेस्सी आणि त्याचा अर्जेंटिना संघ पुढील महिन्यात केरळला येणार नसल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले. हा दौरा लांबणीवर पडला असल्याचे सांगण्यात आले तरी त्याचे भवितव्य अधांतरीच आहे.

केरळ राज्य क्रीडा विभागासोबत प्रायोजक अँटो ऑगस्टीन यांनी मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघ १७ नोव्हेंबर रोजी कोची येथे एक मैत्रीपूर्ण सामना खेळण्याचे नियोजन केले होते; मात्र हा दौरा पुढील महिन्यात होणार नसल्याचे ऑगस्टीन यांनीच जाहीर केले.



फिफाच्या परवानगीस विलंब झाल्यामुळे, अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशनबरोबर चर्चा करून, सामना पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. अर्जेंटिनाचा केरळ दौरा फिफाच्या मंजुरीवर अवलंबून होता. आम्ही नोव्हेंबरमध्ये दोन सामने निश्चित केले होते, असे केरळचे क्रीडामंत्री व्ही. अब्दुर्रहिमान यांनी सांगितले.

मंत्र्यांनी सांगितले, की फिफा मंजुरीसाठी आवश्यक सर्व कागदपत्रे शुक्रवारी रात्री सादर करण्यात आली. फिफाची मंजुरी तत्काळ मिळाली तर सामना अद्याप या नियोजित कालावधीत होऊ शकला असता, असे त्यांनी स्पष्ट केले. कोचीतील जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय स्टेडियमची तपासणी पूर्ण झाली आहे. सध्या स्टेडियममध्ये हॅलोजन लाइट्स आहेत, ज्यांना सुरू होण्यासाठी वेळ लागतो. नवीन लाइट्स बसवण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे.

क्रीडामंत्र्यांनी सांगितले, की मेस्सी एकट्याने केरळला भेट देऊ शकला असता; पण सरकारला पूर्ण अर्जेंटिना संघाचा सामना आयोजित करायचा होता. मेस्सी रोड शोमुळे क्रीडा क्षेत्राला फायदा होणार नाही, म्हणून आम्हाला पूर्ण संघाचा सामना हवा होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)